❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष — निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या** — नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक




## थोडक्यात...

### आत्महत्या प्रकरणात प्राध्यापक निलंबित

मुंबई : दैनिक संध्या

आयआयटी बॉम्बेने बीटेक विद्यार्थी साहिल वाकोडे यांच्या मृत्यूप्रकरणी प्राध्यापक सूर्यनारायण दुल्ला यांना डीन पदावरून निलंबित केले आहे. तसेच, साहिल यांच्या मृत्यूबाबत यापूर्वी केलेल्या वक्तव्यांसाठी संस्थेने माफीही मागितली आहे. आयआयटी बॉम्बेने म्हटले आहे की, साहिल यांच्या मृत्यूपूर्वी नेमके काय घडले होते, याची चौकशी पूर्ण होण्यापूर्वी काहीही सांगणे योग्य नव्हते. २२ वर्षीय साहिल हे आयआयटी बॉम्बेच्या एनर्जी सायन्स अँड इंजिनीअरिंग विभागातील द्वितीय वर्षाचे विद्यार्थी होते. १८ सप्टेंबरच्या रात्री पवई कॅम्पसमधील वसतिगृहाच्या खोलीत ते मृतावस्थेत आढळले होते. आयआयटी बॉम्बेने १९ सप्टेंबर रोजी आपल्या अधिकृत निवेदनात म्हटले होते की, घटनेच्या दिवशी साहिल यांना मिड-सेमिस्टर परीक्षेदरम्यान फोन वापरताना पकडण्यात आले होते. संस्थेने दावा केला होता की, साहिल यांनी ChatGPT वर प्रश्नपत्रिका अपलोड करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वसतिगृहात जाऊन त्यांनी आत्महत्या केली. यावर्षी IIT बॉम्बेमधील आत्महत्येची ही तिसरी आणि देशातील नववी घटना आहे. गेल्या 6 वर्षांच्या कालावधीत 2025 मध्ये सर्वाधिक 16 IIT विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली होती. ग्लोबल IIT माजी विद्यार्थी सपोर्ट ग्रुपनुसार, गेल्या 20 वर्षांत IITच्या एकूण 160 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे.

### बुलेटच्या सायलेन्सर वरुन फिरविला रोलर

वालचंदनगर : दैनिक संध्या

वालचंदनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये बुलेट गाड्यांचे सायलेन्सर बदलून फट् - फट् आवाज करीत फिरणाऱ्या युवकांच्या ११ बुलेट गाड्या जप्त करुन सायलेन्सरवरुन पोलिसांनी रोलर फिरविला. वालचंदनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गोपाळ पवार यांनी पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये हुल्लडबाजी करणाऱ्या युवकांच्या विरोधात कडक मोहिम उघडली आहे. वाहतुक विभागाचे सहायक पोलिस उपनिरीक्षक रमेश शिंदे, पोलिस कॉन्सटेबल अमोल सोनवणे यांनी कारवाई करुन परीसरामध्ये नाकाबंदी करत फट् -फट् आवाज करीत फिरणाऱ्या ११ बुलेट गाड्या जप्त केल्या. बुलेट गाड्यांचे सायलेन्सर काढून सायलेन्सर वरुन रोलर फिरविला आहे. यासंदर्भात पोलिस निरीक्षक गोपाळ पवार यांनी सांगितले की, काही युवकांनी फट् - फट् आवाज करणारे सायलेन्सर पंजाबवरुन मागविले आहेत. चौकामधून फट् - फट् आवाज करुन गाड्या चालवत असून याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होत आहे. अशा गाड्यांच्या विरोधात पोलिसांनी मोहिम उघडली असून तातडीने कारवाई करण्यात येत आहे. परीसरातील नागरिकांनी अशा आवाजाची गाडी फिरत असल्यास तातडीने पोलिसांना कळवावे.त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

# जागतिक कार्यबल गतिशीलता धोरण जाहीर

## देशनिहाय स्किल पासपोर्ट, अद्ययावत प्रशिक्षण आणि सुरक्षित भरती प्रक्रियेवर राज्य शासनाचा भर – मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

जागतिक रोजगाराच्या बदलत्या गरजांनुसार महाराष्ट्रातील युवक-युवतींना कौशल्य आणि भाषा प्रशिक्षण देऊन आंतरराष्ट्रीय रोजगारासाठी सक्षम करण्यात येत आहे. विविध देशांची कुशल मनुष्यबळाची गरज ओळखून देशनिहाय 'स्किल पासपोर्ट' तयार करावा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अन्य प्रशिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम अद्ययावत करावा. तसेच महाराष्ट्रासाठी जागतिक कार्यबल गतिशीलता धोरणांतर्गत परदेशातील रोजगारासाठी सुरक्षित भरती व्यवस्था विकसित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलतेवरील एकदिवसीय उच्चस्तरीय परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), राजशिष्टाचार विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड ॲडव्हान्समेंट (महिमा) यांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जागतिक स्तरावरील बदलती लोकसंख्या आणि वाढते वृद्धत्व यामुळे कुशल मनुष्यबळाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. भारतातील युवा मनुष्यबळाची क्षमता लक्षात घेऊन जागतिक मागणीशी कुशल मनुष्यबळाची प्रभावी सांगड घालावी लागेल. त्यातून 'सर्क्युलर मोबिलिटी ऑफ टॅलेंट' ही संकल्पना अधिक सक्षम होईल आणि महाराष्ट्र या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल. भारताने सुमारे २८ देशांसोबत कामगार गतिशीलतेसंदर्भात करार केले आहेत. या देशांमध्ये अभियांत्रिकी, आरोग्यसेवा, बांधकाम आणि विविध तांत्रिक क्षेत्रांतील कुशल मनुष्यबळाला मोठी मागणी आहे.



### युवक-युवतींना भाषा प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार

महाराष्ट्रातील युवक-युवतींना परदेशातील रोजगार संधी सुलभ व्हाव्यात आणि भाषिक अडचणी दूर व्हाव्यात यासाठी केंद्र शासनाचा डिजिटल इंडिया भाषिणी, मित्रा आणि महिमा यांच्यात सामंजस्य करार झाला. भाषांतर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उमेदवारांना परदेशी आणि व्यवसायनिहाय भाषांचे मोफत व सुलभ प्रशिक्षण मिळणार असून, या प्रायोगिक प्रकल्पाचा औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रनिकेतनमधील विद्यार्थ्यांना लाभ होईल. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलता ही केवळ मनुष्यबळाच्या स्थलांतराची प्रक्रिया नसून कौशल्य, गुंतवणूक, प्रवासी भारतीय समुदाय आणि जागतिक बाजारपेठेला जोडणारी आर्थिक भागीदारी आहे. मुंबईतील परदेशी वाणिज्य दूतावासांचे नेटवर्क, उद्योग, विद्यापीठे आणि कौशल्य विकास संस्थांचा समन्वय साधून महाराष्ट्रातील प्रतिभेला जागतिक संधींशी जोडण्यात येईल.



### 'दगडूशेठ' बाप्पाला १३४ लीटर किगा कोकोज आईस्क्रीमचा नैवेद्य

**पुणे (दै. संध्या) :** तब्बल १३४ लिटर फ्रेश दूध... ताजा ओला नारळ... शहाळ्याचे तुकडे आणि मध्यभागी चॉकलेट फिलिंग वापरून तयार केलेल्या १३४ लिटर किगा कोकोज आईस्क्रीमचा नैवेद्य श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला दाखविण्यात आला. पुण्यातील सुप्रसिद्ध किगा आईस्क्रीम च्या वतीने हा नैवेद्य अर्पण करून तो प्रसाद भाविकांना देण्यात आला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने यंदा १३४ व्या वर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून त्या १३४ वर्षपूर्तीनिमित्त १३४ लिटर आईस्क्रीमचा नैवेद्य किगा आईस्क्रीम च्या वतीने दाखविण्यात आला. यावेळी किगा आईस्क्रीम चे संचालक गणेश गोसावी, किरण साळुंखे यांसह ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी यांसह विश्वस्त, मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपक्रमाचे ६ वे वर्ष होते. गणेश गोसावी म्हणाले, दगडूशेठ हलवाई गणपतीला विशेष प्रसाद म्हणून यंदा या विशेष नारळ फ्लेव्हर आईस्क्रीमची निर्मिती करण्यात आली आहे. नारळाच्या करवंटी सारख्या अर्ध्या आकारात साकारण्यात आलेल्या या आईस्क्रीमच्या मध्यभागी खास चॉकलेट फिलिंग देण्यात आले आहे. या विशेष आईस्क्रीमच्या निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणात ताज्या ओल्या नारळाचा कीस तसेच शहाळ्याचे छोटे-छोटे तुकडे वापरण्यात आले आहेत. त्यामुळे आईस्क्रीमला नारळाची नैसर्गिक चव, सुगंध आणि ताजेपणा मिळतो.

# अमित ठाकरेंचा संवेदनशीलपणा

केमिकल रंगाने रंगलेल्या चिमुकल्यांना पाहून वेदना, मदतीसाठी पुढाकार, मनसैनिकांना आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यात लहान मुलांना कामावर ठेवणे किंवा त्यांच्याकडून काम करुन घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. बालकामगार कायद्यान्वये संबंधितांवर गुन्हा देखील दाखल होऊ शकतो. मात्र, घरची परिस्थिती आणि उदरनिर्वाहासाठी कित्येक बालकांना, चिमुकल्यांना शालेय जीवनातच कामाला जावे लागते. अनेकदा कुठं चहाच्या कँटीनमध्ये किंवा हॉटेलमध्ये, मजुरीसाठी बिगाऱ्याच्या हाताखाली तर, कधी विटभट्टीवरही लहानगी मुले काम करताना दिसतात. मात्र, सध्या गर्दी, जत्रा, उत्सव आणि महानगरांतील वर्दळीच्या ठिकाणावर अंगाला व्हाईटर (पांढरा रंग) लावलेली चिमुकली मुले दिसतात. मात्र, याच मुलांच्या वेदना राजपुत्र अमित ठाकरेंनी जाणून घेत मनसैनिकांना आवाहन केलंय.

सध्या गणेशोत्सव सुरू आहे, सगळीकडे आनंदाचं वातावरण आहे. पण, या सगळ्यात रस्त्यावर एक गोष्ट पाहायला मिळते आहे. लहान लहान मुलांच्या अंगाला सिल्वर केमिकलचे रंग लावून त्यांना देव किंवा महापुरुषांच्या रुपात उभं केलं जात आहे आणि त्यांच्याकडून भीक मागून घेतली जात आहे. हे अतिशय भीषण आहे, असे म्हणत अमित ठाकरेंनी या बालमनाच्या, बालरुपामागे दडलेलं भीषण वास्तव समाजासमोर मांडलं आहे. तसेच, मनसैनिकांना अमित ठाकरेंनी आवाहन देखील केलंय. माझं सर्व महाराष्ट्र सैनिकांना आणि नागरिकांना आवाहन आहे, ती लहान मुलं आहेत, निष्पाप आहेत. त्यामुळे आसपास असं काहीही दिसलं, तर ते तिथल्या तिथे थांबवा. त्या कुटुंबाला जी काही मदत हवी असेल ती आपण आपल्या परीने करू, मी स्वतःसुद्धा त्यांच्या पाठीशी उभा राहीन. पण लहान मुलांचं असं शोषण अजिबात होऊ देऊ नका, असे म्हणत अमित ठाकरेंनी मनसैनिकांना तसेच नागरिकांना, आणि त्या मुलांच्या पालकांनाही असं होऊ न देण्याचं आवाहन केलं आहे. हे चित्र आपल्याला बदलायचंच आहे... जिथे असं दिसेल, तिथे ही गोष्ट त्वरित थांबवा.. अशा सूचनाच अमित ठाकरेंनी मनसेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. दरम्यान, अनेक गर्दीच्या ठिकाणी, रेल्वे स्थानकावर, जत्रा, यात्रा, उत्सव काळात लहान मुले अशी भीक मागताना दिसतात. या मुलांना पाहून इतर लहान मुलांना अप्रूव्ह वाटतं. कधी गांधींजींच्या रुपात, कधी सुभाष चंद्र बोस यांच्या रुपात तर आणखी कुण्या महापुरुषांच्या रुपात ही चिमुकली मुले दिसून येतात. मात्र, या मुलांच्या अंगाला केमिकल कलर लावून शरीर उघडं ठेऊन करमणुकीचं साधन बनवलं जातं, हेही बालकामगार कायद्याचं उल्लंघनच आहे. मात्र, कामगार आयुक्त किंवा तत्सम यंत्रणा मात्र याकडे दुर्लक्ष करते हेच आजपर्यंतचे चित्र आहे. आता, अमित ठाकरे यांच्या आवाहनानंतर हे चित्र बदलेल अशी आशा व्यक्त होत आहे.



# 'आदर्श नोंदणी पॅटर्न' आता देशभरात

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचे केंद्रीय सचिवांकडून कौतुक



■ मुंबई (दै. संध्या)

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून अस्तित्वात आलेल्या मॉडेल नोंदणी कार्यालयांच्या उपयोगितेची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. पुणे येथे सुरू झालेले मॉडेल नोंदणी कार्यालय आता देशभर प्रारंभ करण्याचे निर्देश केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायत राज मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागाने दिले आहेत. विशेष म्हणजे, केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांनी अशी कार्यालये देशभर सुरू करण्यासाठी प्रत्येक कार्यालयासाठी ५० लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आल्याचे सांगितले. केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावित 'केंद्रीय नोंदणी विधेयक, २०२६' संदर्भात सर्व राज्यांच्या नोंदणी महानिरीक्षकांची व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला राज्याचे नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक रविंद्र बिनवडे व उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे उपस्थित होते.

### आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयाची रचना

- पुणे येथील कोथरूड भागात महाराष्ट्रातील पहिले कार्यालय सुरू
- पहिल्या टप्प्यात राज्यात आदर्श दुय्यम निबंधक कार्यालये
- मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या सहा प्रमुख जिल्ह्यांमधील मुख्यालयांच्या ठिकाणी ३० नवीन आदर्श कार्यालये
- 'स्लॉट बुकिंग'द्वारे अत्यंत जलद दस्त नोंदणी.
- हाय-स्पीड स्कॅनिंगद्वारे त्वरित डिजिटल दस्त रेकॉर्ड.
- अत्याधुनिक बायोमॅट्रिकद्वारे जलद डिजिटल ओळख पडताळणी.
- एकाच दिवसात दस्त नोंदणी व पावती.
- कागदपत्रांची पूर्व तपासणी करून त्रुटींचे निवारण.
- हेल्पडेस्कद्वारे प्रवेशापासून अर्ज भरेपर्यंत वैयक्तिक मार्गदर्शन.
- डिजीटल टोकन आणि स्क्रीनवर थेट डिस्प्ले.
- आरामदायी सोफे असलेले सुसज्ज वातानुकूलित प्रतीक्षालय.
- सर्व नागरिकांना विनामूल्य हाय-स्पीड वाय-फाय सुविधा.
- स्वच्छ प्रसाधने, पिण्याचे पाणी आणि चहा-कॉफी

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी व मुद्रांक विभागाने महसूलवाढीसोबतच नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना यशस्वीपणे राबविले जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्यावर, सर्व राज्यांनी असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत अशा सूचना करण्यात आल्या आहेत." महाराष्ट्राच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने सुरू केलेल्या 'एक जिल्हा, एक नोंदणी', 'ई-प्रमाण', पासपोर्ट कार्यालयांच्या धर्तीवर उभारलेली'आदर्श कार्यालये' आणि 'ई-नोंदणी' यांसारख्या गतिमान उपक्रमांचे केंद्रीय सचिवांनी विशेष कौतुक केले. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेला गती देत, नागरिकांच्या सोयीसाठी भविष्यातही अधिक लोकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने पुणे येथे सुरू झालेल्या मॉडेल कार्यालयाची दखल केंद्राने घेतली. यातूनच या कार्यालयाची उपयोगिता लक्षात येते", अशी प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

# दुष्काळाच्या प्रश्नावर शरद पवार ॲक्शन मोडमध्ये

## *२८ सप्टेंबरपासून दुष्काळी भागात दौरा करण्याची शक्यता, रोहित पवारांचा सरकारला आंदोलनाचा इशारा*

■ पुणे/मुंबई (दै. संध्या)

राज्यात पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार पुन्हा एकदा मैदानात उतरणार आहे. शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी शरद पवार येत्या 28 सप्टेंबरपासून राज्याच्या दुष्काळी भागाचा दौरा करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

दुसरीकडे, पक्षाचे युवा नेते आणि आमदार रोहित पवार यांनीही मराठवाड्यातील दुष्काळाची पाहणी सुरू केली असून, सरकारने तत्काळ मदत न केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा थेट इशारा दिला आहे. अनेक जिल्ह्यांत अत्यंत कमी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचा संपूर्ण खरीप हंगाम वाया गेला आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांना उभ्या पिकांवर नांगर फिरवावा लागला आहे. राज्य सरकारने ५ ऑक्टोबरपासून पंचनामे करण्याचे जाहीर केले असले तरी, 'मदत कधी मिळणार?' या विवंचनेत शेतकरी आहे. याच पार्श्वभूमीवर, देशाचे माजी कृषी मंत्री शरद पवार २८ सप्टेंबरपासून थेट



शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे अश्रू पुसणार आहेत. यापूर्वीच त्यांनी सरकारला पत्र लिहून राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची आणि हेक्टरी ५० हजार रुपये मदतीसह एकूण ९ मागण्या केल्या होत्या. आता त्यांच्या या प्रत्यक्ष दौऱ्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे.

एकीकडे शरद पवारांच्या दौऱ्याचे नियोजन सुरू असताना, दुसरीकडे आमदार रोहित पवार यांनी कालपासूनच दुष्काळी भागाची पाहणी सुरू केली आहे. धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यांतील विदारक परिस्थिती जवळून पाहिल्यानंतर त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधले आहे. "पावसाअभावी संपूर्ण खरीप हंगाम वाया गेलाय. शेतकऱ्यांशी चर्चा करताना त्यांच्या डोळ्यांत दिसणारी हतबलता काळीज चिरणारी आहे," अशा शब्दांत त्यांनी दुष्काळाची भीषणता मांडली. परतीच्या पावसाची आशाही धूसर झाल्याने शेतकरी पूर्णपणे खचला आहे. "पिण्याच्या पाण्याचं काय, तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या फळबागा कशा जगवायच्या आणि मुक्या जनावरांच्या चारा-पाण्याचं काय करायचं, या विवंचनेत शेतकरी आहे. ही भीषण अवस्था पाहूनही सरकार अजून शांत कसं बसू शकतं?" असा संतप्त सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. दुष्काळाच्या या संकटात सरकारने राजकारण बाजूला ठेवून युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे. "सरकारने एक क्षणही वाया न घालवता शेतकरी आणि शेतमजुरांना भरीव मदत देण्याबाबत काम सुरू करावे. विरोधी पक्ष म्हणून आमची सरकारला सहकार्याचीच भूमिका राहील, पण सरकार निष्क्रिय राहणार असेल तर त्याला जागं करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आम्हाला रस्त्यावर उतरावं लागेल," असा इशाराही रोहित पवार यांनी सरकारला दिला आहे.



# संपादकीय

## जिल्हा बँक निवडणूक साशंकता? आणि ठरावांचा धुरळा!

राज्यातील जिल्हा सहकारी बँकांच्या संचालकाच्या पदासाठी कमाल दहा वर्षाच्या कार्यकाळाची तरतूद लागू करण्याच्या रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या निर्णयाने महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील विद्यमान संचालकामध्ये संभ्रमता निर्माण झालेली आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक असलेले राज्याचे विद्यमान सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यावर आरबीआयने नुकतीच कारवाई केल्याने जिल्हा बँकेच्या आगामी संचालकांच्या निवडणुकीमध्ये या नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्यास बहुसंख्य जेष्ठ व मातब्बर अनुभवी संचालकांना घरी बसावे लागणार आहे.लातूर जिल्हा बँक प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या निर्देशानंतर आरबीआयने ही कारवाई केली असल्याचे मानले जात आहे. महाराष्ट्रातील सहकारी बँकांमधील सक्षम सहकारी बँका म्हणून पुणे. अहिल्यानगर कोल्हापूर सातारा या बँकाचा अग्रस्थानी समावेश आहे. दैदीप्यमान म्हणून लौकीकपात्र असलेली पुणे जिल्हा बँकेच्या आगामी संचालकपदाचे निवडणुकीत हा नियम लागू झाल्यास बँकेचे विद्यमान संचालक व राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील. माजी आमदार संग्राम थोपटे. जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे. रमेश थोरात. रेवणनाथ दारवटकर. दिलीपराव मोहिते संजय काळे. आणि आप्पासाहेब जगदाळे. या विद्यमान संचालकांना आगामी निवडणुकीत उभे राहता येणार नाही. या संचालकांच्या उमेदवारी समोर कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्वांच्या कार्यकाळाचा दहा वर्षाचा नेमका संबंध कसा ठरवला जातो याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. आरबीआयच्या बँकींग रेग्युलेशन कायद्यामधील सुधारणेनुसार सहकारी बँकांच्या संचालकांना कमाल दहा वर्षाचा सलग कार्यकाळ निश्चित करण्यात आलेला आहे. केंद्र सरकारच्या माहितीनुसार संचालक मंडळातील अध्यक्ष व अन्य संचालकांसाठी ही कमाल दहा वर्षाची मर्यादा आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील आठ संचालकांच्या दहा वर्षपेक्षा अधिक कार्यकाळाबाबत स्थानिक मंडळींनी तक्रार केलेली होती. त्यानंतर हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठापर्यंत गेले. छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने आरबीआयला या तक्रारीवर निर्णय घेण्याचे निर्देश दिलेले होते त्यानंतर १८ सप्टेंबरला आरबीआयने संबंधित संचालकविरुद्ध कारवाईचे आदेश दिले. सहकार मंत्री श्री पाटील यांनी आरबीआयच्या निर्णयावर आक्षेप घेत उच्च न्यायालयात दाद मागण्याची भूमिका मांडलेली आहे. त्यामुळे या नियमाची अंमलबजावणी जुन्या नियुक्त्या आणि विद्यमान संचालकांच्या कार्यकाळाबाबतचा कायदेशीर प्रश्न पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. लातूर जिल्हा बँकेतील कारवाईनंतर या नियमाचे अंमलबजावणी बाबत न्यायालयीन लढाईची शक्यता निर्माण झालेली आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आरबीआयच्या या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्याची भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत या नियमाचे अंमलबजावणीबाबत काय भूमिका स्पष्ट होते यावरच राज्यातील सहकारी बँकांच्या येऊ घातलेल्या संचालक मंडळ निवडणुकावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. पुणे जिल्ह्यात अनेक नेत्यांची राजकीय कारकीर्दीची सुरुवात सहकार क्षेत्रातील विविध कार्यकारी सोसायटी. तालुका खरेदी विक्री संघ. मार्केट कमिटी. व जिल्हा बँकेच्या माध्यमातून झालेली आहे जिल्ह्यातील विकास सोसायटी मार्फत शेतकरी सभासदांना पीक कर्ज वाटपात पुणे जिल्हा बँकेची महत्त्वाची भूमिका असते त्यामुळे गाव पातळीपासून जिल्हास्तरापर्यंत सहकारातील नेतृत्व उभे राहण्यास जिल्हा बँकेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दरम्यान पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झालेली असून येणाऱ्या २२ सप्टेंबरपर्यंत विविध कार्यकारी सोसायटीचे संस्था प्रतिनिधी ठराव दाखल होणार असून आगामी तीन ते चार महिन्यात प्रत्यक्ष निवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरबीआयच्या दहा वर्षाच्या नियमाची अंमलबजावणी कशी होते याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागलेले आहे. पुणे शहराच्या लक्ष्मी रस्त्यावरील सिटी पोस्ट चौकातील एका छोट्याशा जागेत पुणे जिल्हा सहकारी बँकेची स्थापना करण्यात आली. या सहकारी बँकेचे नेतृत्व आतापर्यंत सहकार महर्षी मामासाहेब मोहोळ.मुगुटराव काकडे.साहेबराव सातकर. रघुनाथराव सातकर. बाबालाल काकडे. शिवाजीराव काळे.राजेंद्रकुमार घोलप.चंदूकाका जगताप. दत्तोबा ढमढेरे.साहेबराव जाचक. माधवराव टापरे. रमेश ढमाले. अशोक मोहोळ. अजित पवार रमेश थोरात यांनी समर्थपणे केलेले आहे.पुणे जिल्हा बँकेचा आशिया खंडात व भारतातील सहकार क्षेत्रात मोठा लौकिक आहे. नव्याने होऊ घातलेल्या संचालक पदाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक तालुक्यामध्ये मोठी चुरस निर्माण झालेली आहे महायुतीमध्ये व महाआघाडीमध्ये संचालक पदाची उमेदवारी मिळवण्यासाठी तीव्र स्पर्धा निर्माण झालेली आहे. पुणे जिल्हा बँकेची यापूर्वी झालेली निवडणूक स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली झालेली होती. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला घवघवीत यश प्राप्त झालेली होते . यापूर्वीच्या निवडणुकीत काँग्रेसकडून माजी आमदार संग्राम थोपटे (भोर) संजय जगताप (पुरंदर)या दोघांची संचालक म्हणून निवड झालेली होती. यांनी नुकताच भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत ते भारतीय जनता पक्षातर्फे पुन्हा जिल्हा बँकेत संचालक म्हणून येण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीकडून यावेळी एकमेव माजी आमदार अशोक पवार शिरूर मधून लढण्याची शक्यता आहे. जिल्हा बँकेच्या संचालक पदासाठी प्रत्येक तालुक्यातून विद्यमान संचालक मोठ्या तयारीनिशी उभे ठाकलेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने संजय काळे(जुन्नर) दिलीप वळसे पाटील(आंबेगाव )दिलीप मोहिते पाटील(खेड) अशोक बापू पवार(शिरुर( संजय जगताप(पुरंदर) संग्राम थोपटे(भोर( आप्पासाहेब जगदाळे(इंदापूर )रेवणनाथ दारवटकर(वेल्हे) रमेश थोरात(दौड) माऊली दाभाडे(मावळ) प्रकाश म्हस्के. शेखर दांगट (हवेली)रणजित तावरे (बारामती)यांच्या नावाचा समावेश आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीची पूर्वतयारीचे रणशिंग फुंकले गेले असून जिल्ह्यातील व सहकार क्षेत्रातील सत्ताकारणाला आता चांगलीच धार आलेली आहे. इच्छुकांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. संचालक मंडळातील २१जागासाठी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावोगावी सोसायट्यांचे ठरावाचे राजकारण तापलेले असून प्रस्थापित नेत्यांसह नव्या सधन पैसेवाल्या दमदार इच्छुकांनीही जोरदार मोर्चेबांधणी सुरू केलेली आहे बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया २०२६/२७ ते २०३१/३२या कालावधीसाठी असल्याचे समजते. प्राथमिक मतदार यादीतील माहितीनुसार ७६१७ सभासद संस्था आणि १६७९ वैयक्तिक मतदार असे एकूण ९२९६ मतदारांचा आकडा आहे. त्यापैकी अ वर्ग १३७७ सोसायटी या निवडणुकीसाठी महत्त्वाच्या मानल्या जातात. तर ब वर्गातील १६१. क वर्ग १७११ आणि ड वर्ग ४३६८ संस्था निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या या बालेकिल्ल्यात भाजप जोरदार तयारीत उतरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. भारतीय जनता पक्षाचे पॅनलचे नेतृत्व पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांच्याकडे असल्याचे समजते. बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस. शरद पवार राष्ट्रवादी. भारतीय जनता पक्ष. शिंदे शिवसेना.यांच्या कार्यकर्त्यांनी संचालक पदासाठी अर्ज भरलेले आहेत. त्यामुळे सोमेश्वरची निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पक्षाने सोमेश्वर कारखान्याच्या निवडणूकीत त्यांच्या पॅनलचे नेतृत्व माजी आमदार संजय जगताप व माळेगावचे माजी चेअरमन चंदरराव तावरे यांच्याकडे दिले असल्याचे समजते या सोमेश्वर कारखान्याचे निवडणुकीचे पार्श्वभूमीवर विचार करता आगामी पुणे जिल्हा पुणे जिल्हा बँकेची संचालक पदाची निवडणूक चुरशीची होण्याची दाट शक्यता असल्याची चर्चा आहे.या निवडणूकीत महायुती एकसंघपणे निवडणूक लढवते की स्वबळाचा नारा देते. यावरच पुढील यश अवलंबून राहाणार आहे.

# सिंबायोसिस येथे 'माहेरवाशीण' उपक्रमाचा शुभारंभ

## "सुरक्षित मातृत्व ही केवळ आरोग्याची बाब नसून सामाजिक जबाबदारी" – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

■ पुणे (दै. संध्या)




सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय व संशोधन केंद्र आणि सिंबायोसिस वैद्यकीय महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने माहेरवाशीण – मातृत्व सेवेची नवी संकल्पना' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आज लवळे, पुणे येथे उत्साहात झाला. या प्रसंगी गर्भवती मातांसाठी तयार करण्यात आलेल्या 'माहेरवाशीण' माहिती पुस्तिकेचे प्रकाशन महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते आमदार श्री. शंकर मांडेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. आर. रमण, डॉ. राजीव येरवडेकर, प्रोव्होस्ट, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान विद्याशाखा, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ तसेच सिंबायोसिस चे संस्थापक व अध्यक्ष प्रा. (डॉ.) शां. ब. मुजुमदार आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात सुरक्षित मातृत्व ही केवळ आरोग्य व्यवस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले. मातेला सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि आपुलकीची प्रसूतीसेवा मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. वैद्यकीय उपचारांसोबतच मातेला मानसिक आधार, सन्मान आणि विश्वासाची भावना देणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले. निरोगी माता म्हणजे निरोगी कुटुंब आणि निरोगी कुटुंब म्हणजे सक्षम महाराष्ट्र," असे सांगत सौ. पवार यांनी महिला व बालकांच्या आरोग्याचा प्रश्न हा केवळ वैद्यकीय विषय नसून कुटुंब, समाज आणि राज्याच्या सर्वांगीण विकासाशी निगडित असल्याचे स्पष्ट केले. ग्रामीण आणि दुर्गम भागातील महिलांपर्यंत मातृत्वाच्या आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज अधोरेखित करताना त्यांनी आशा स्वयंसेविकांच्या भूमिकेचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे तळागाळातील महिलांना योग्य मार्गदर्शन व आरोग्यसेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राने महिला शिक्षण, आरोग्य, सन्मान आणि सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात देशाला नेहमीच दिशा दिली आहे. 'महेरवाशिणी'सारखे उपक्रम विकासाला माणुसकीची नवी दिशा देणारे आहेत, असेही त्यांनी नमूद केले. 'माहेरवाशीण' उपक्रमाची संकल्पना डॉ. राजीव येरवडेकर यांनी मांडली असून, प्रत्येक रुग्णालय हे गर्भवती महिलेसाठी तिच्या माहेरासारखे प्रेम, आधार आणि सुरक्षितता देणारे ठिकाण असावे, ही या संकल्पनेमागील मुख्य भूमिका आहे. प्रसूतीसाठी रुग्णालयात येणाऱ्या महिलेकडे केवळ 'रुग्ण' म्हणून न पाहता, 'माहेरवाशीण' म्हणजेच माहेरी आलेली मुलगी म्हणून सन्मानाने आणि आपुलकीने पाहण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'माहेरवाशीण' उपक्रम केंद्र व राज्य शासनाच्या मातृत्वविषयक योजनांना पूरक ठरणार आहे. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान आणि जननी सुरक्षा योजना यांसारख्या योजनांच्या उद्दिष्टांशी या उपक्रमाची सांगड घालण्यात आली आहे. ग्रामीण भागातील आशा स्वयंसेविकांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना 'महेर-दूत' म्हणून सक्षम केले जाणार आहे. तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या 'कुटुंब दत्तक योजना' या उपक्रमाशीही याची सांगड घालण्यात येणार असून, भावी डॉक्टरांमध्ये रुग्णांविषयी संवेदनशीलता, सहानुभूती आणि सेवाभाव विकसित करण्यास यामुळे मदत होणार आहे. यावेळी मातृत्व व बाल आरोग्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या आरोग्यसेवकांचा तसेच लाभार्थी मातांचा सत्कार करण्यात आला.

"माहेरवाशीण' 'च्या माध्यमातून सिम्बायोसिसने मातृत्व सेवेला केवळ वैद्यकीय उपचारांपुरते मर्यादित न ठेवता, सुरक्षितता, सन्मान, माया, आपुलकी आणि विश्वास यांची जोड देत प्रत्येक मातेसाठी रुग्णालयाला खऱ्या अर्थाने 'माहेर' बनविण्याचा अभिनव प्रयत्न केला आहे.

### चार प्रमुख आधारस्तंभ निश्चित

- माहेर अनुभव : प्रसूतीपूर्व व प्रसूतीदरम्यान मातेला प्रेमळ, आश्वासक वातावरण, परिचारिकांचे संवेदनशील सहकार्य आणि प्रसूतीच्या वेळी आपल्या पसंतीच्या व्यक्तीची साथ.
- माहेर पोषण : तज्ज्ञ आहारतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मातेसाठी पौष्टिक व संतुलित आहार, तसेच स्थानिक आणि पारंपरिक आहारपद्धतींचा योग्य समावेश.
- माहेर संस्कृती : मातृत्वाशी संबंधित कौटुंबिक व सांस्कृतिक परंपरांचा सन्मान राखत सुरक्षित रुग्णालयीन वातावरणात डोहाळे जेवण यांसारख्या प्रथा पार पाडण्याची सुविधा.
- माहेर बाळंतपणोत्तर काळजी : प्रसूतीनंतर मातेला आरोग्य पुनर्वसन, स्तनपान मार्गदर्शन, नवजात बालकाची काळजी, प्रसूतीनंतरच्या नैराश्याची तपासणी तसेच घरी जाताना विशेष 'महेर किट' देण्याची व्यवस्था.

## धामणीच्या खंडोबाचे दीपमाळ बांधकामाला सोनेवाडी ग्रामस्थांकडून देणगी

■ मंचर (दै. संध्या)

श्री म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिर धामणी (तालुकाआंबेगाव) येथील महाद्वारासमोर लोकसहभागातून नवीन दगडी दीपमाळ बांधण्याचे कामासाठी सोनेवाडी बुद्रुक (तालुका निफाड. जिल्हा नाशिक) येथील समस्त सोनेवाडीच्या ग्रामस्थांनी बैठक घेऊन सोनेवाडी बुद्रुक गावाच्या वतीने सहकार्य करण्याचे ठरवण्यात आले. या सर्व ग्रामस्थांनी दोन दिवसात रूपये ११९६१६/ (रूपये एक लाख एकोणीस हजार सहाशे सोळा फक्त) ची स्वेच्छेने एकत्रित देणगी जमा केली. मंगळवारी (१५ सप्टेंबर २६) सोनेवाडी बुद्रूक येथून ४० हून अधिक ग्रामस्थ खंडोबा देवस्थान मंदिर धामणी येथे येऊन कुलस्वामी खंडेरायाचे दर्शन घेऊन "सदानंदाचा येळकोट "चा जयघोष भंडारा उधळून रुपये ११९६१६/ त्यांनी देवस्थानाचे सेवेकरी व ग्रामस्थ मंडळीच्या स्वाधीन केली.यावेळी प्रविण अशोक पडोळ पाटील. योगेश पडोळ . भाऊराव पडोळ . उत्तम पडोळ . प्रविण भाऊराव पडोळ . नंदू पडोळ. नारायण पडोळ . सिताराम आहेर .रामदास



पडोळ . सुनिल पडोळ . जनार्दन पडोळ. अनिल पडोळ . राजू पडोळ . ईश्वर पडोळ . रमेश पडोळ . संदीप पडोळ.व समस्त पडोळ मंडळीचा देवस्थानाच्या वतीने पहाडद-याचे सरपंच मच्छिंद्र वाघ. दादाभाऊ भगत. सुभाष तांबे. दगडू करंजखेले. माऊली बो-हाडे यांनी मानाची टोपी शाल व श्रीफळ प्रदान करून देणगीदाराचा सत्कार करण्यात आला.

## राजुरी येथे मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ नारायणगाव (दै. संध्या)

न्यूरोनेस्ट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, मोशी (पुणे) उम्मत की खिदमत फाउंडेशन आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, राजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने राजुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत मेंदू, मणका व अस्थिरोग तपासणी शिबिराला जुन्नर तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शिबिरात ३०० हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरातील आरोग्यसेवेबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

तपासणी दरम्यान सुमारे ४० रुग्णांना पुढील निदानासाठी एमआरआय तपासणी करण्याचा सल्ला देण्यात आला. या रुग्णांची एमआरआय तपासणी उम्मत की खिदमत फाउंडेशनच्या वतीने डॉ. पंजाबराव कथे यांच्या डायग्नोस्टिक सेंटरमध्ये सवलतीच्या दरात करून देण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे मुख्य प्रवर्तक हाजी गुलामनबी शेख यांनी दिली. गरजू रुग्णांना वेळेवर निदान व उपचार मिळावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या



शिबिरास जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, माजी सभापती दीपक औटी, शिवसेना युवा नेते पंकज कणसे, माजी सरपंच माऊली शेळके, मुसलमान जमात राजुरीचे अध्यक्ष शाकीर चौगुले, राजुरी गावातील आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावून उपक्रमाला प्रोत्साहन दिले. शिबिराच्या यशस्वितेसाठी न्यूरोनेस्ट हॉस्पिटलचे डॉ. अभिजित घंगाळे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. अमोल बांगर व त्यांचे कर्मचारी, तसेच संकल्प व उम्मत फाउंडेशनचे स्वयंसेवक जिलानी पटेल, आरिफ पटेल, वसीम पटेल, आदिल पटेल, मुजम्मील पठाण, सुफियान मोमीन, मोहसीन जमादार, जाकीर पटेल,आणि इतर सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उम्मत की खिदमत फाउंडेशनचे मुख्य प्रवर्तक हाजी गुलामनबी शेख यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, तर फाउंडेशनचे मुख्य समन्वयक प्रा. मेहबूब काझी यांनी सर्व डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवक, मान्यवर व सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे आभार मानले.

गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणाचेही उपचार थांबू नयेत, यासाठी अशा सामाजिक आरोग्य उपक्रमांचे आयोजन सातत्याने दरमहा करण्याचा आमचा प्रयत्न आहे,अशी भावना हाजी गुलामनबी शेख यांनी व्यक्त केली.

# जुन्नर शहरातून ३५१ फुटी तिरंगा यात्रा

### युवा शक्तीने दिला राष्ट्रनिर्माणाचा संदेश

■ नारायणगाव (दै. संध्या)

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जुन्नर शहराच्या वतीने भारतीय सुरक्षा दलांच्या सन्मानार्थ ३५१ फुटी भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेत जुन्नर शहरातील युवा वर्गाने मोठ्या उत्साहाने सहभाग घेत राष्ट्रप्रेम, सकारात्मकता आणि राष्ट्रनिर्माणाचा संदेश दिला. आजच्या युवा पिढीसमोर विविध माध्यमांमधून नकारात्मक विचार आणि वातावरण निर्माण होताना दिसते. या नकारात्मक वातावरणाचे सकारात्मक ऊर्जेत रूपांतर व्हावे, युवकांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, सकारात्मक विचार आणि देशसेवेची भावना निर्माण व्हावी, तसेच देशाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या भारतीय सुरक्षा दलांप्रती कृतज्ञता व्यक्त व्हावी, या उद्देशाने या तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या भव्य यात्रेत शंकरराव बुट्टे महाविद्यालय, श्री शिवछत्रपती महाविद्यालय, प्रज्ञान करिअर अकॅडमी, लक्ष करिअर अकॅडमी, श्री छत्रपती शिवाजी महाराज पोलीस भरती अकॅडमी आणि यांसह विविध शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. तसेच शहरातील विविध राष्ट्रप्रेमी संघटना, राष्ट्रप्रेमी नागरिक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. "भारत माता की जय", "वंदे मातरम्" अशा जयघोषांनी संपूर्ण जुन्नर शहर दुमदुमून गेले. ३५१ फुटी तिरंगा हातात घेऊन मोठ्या संख्येने एकत्र आलेल्या युवकांनी राष्ट्रभक्तीचा जागर करत भारतीय ध्वजाबद्दलचा अभिमान व्यक्त केला.

यावेळी माजी सैनिक संघ, जुन्नर यांच्या सर्व माजी सैनिकांचा विशेष सहवास विद्यार्थ्यांना लाभला. देशाच्या रक्षणासाठी आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ समर्पित करणाऱ्या माजी सैनिकांच्या उपस्थितीने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. यावेळी माजी सैनिक उमेश अवचट यांनी विद्यार्थ्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि त्याची जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा संविधानाने दिलेला महत्त्वाचा अधिकार असून, त्याचा वापर जबाबदारीने आणि



विधायक पद्धतीने केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. युवकांनी आपल्या विचारांचा उपयोग सामाजिक प्रबोधन, सकारात्मक परिवर्तन, देशहिताचे प्रश्न मांडणे आणि राष्ट्रनिर्माणासाठी करावा. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आधार घेऊन देशाची प्रतिमा मलिन करण्याऐवजी, आपल्या विचारांमधून देशाला पुढे नेण्याचे कार्य युवकांनी केले पाहिजे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. सोशल मीडिया आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही सकारात्मक व समाजोपयोगी कार्यासाठी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अखिल भारतीय सेवार्थ विद्यार्थी प्रमुख भवानी शंकर शर्मा यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. आजची Gen-Z पिढी आधुनिक विचारांची आणि तंत्रज्ञानस्नेही असतानाच भारतीय संस्कृती, संस्कार आणि राष्ट्रभावनेशी जोडलेली असणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतातील सर्व महापुरुषांच्या विचारांना व संस्कारांना सोबत घेऊन चालणारा युवा हा देशाच्या उज्ज्वल भवितव्याचा आधार आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

आजच्या युवकांनी केवळ सोशल मीडिया आणि आभासी जगापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष समाजजीवनात सकारात्मक योगदान द्यावे, सामाजिक प्रश्न समजून घ्यावेत आणि राष्ट्राच्या प्रगतीमध्ये आपली भूमिका बजावावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जिल्हाप्रमुख प्रा. मनोहर चव्हाण सर, जिल्हा संयोजक दर्शन सोनवणे यांच्यासह विद्यार्थी परिषदेचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, माजी सैनिक, राष्ट्रप्रेमी नागरिक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ३५१ फुटी तिरंगा यात्रेच्या माध्यमातून "राष्ट्र प्रथम" ही भावना युवकांच्या मनामध्ये रुजवण्याचा आणि सकारात्मक, संस्कारी व जबाबदार युवा शक्ती उभी करण्याचा संदेश देण्यात आला. जुन्नर शहरातील युवा शक्तीने एकजुटीने दिलेला हा राष्ट्रभक्तीचा संदेश संपूर्ण शहरासाठी प्रेरणादायी ठरला.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |

दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)

Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# जिल्ह्यातील युवकांनी रोजगार मेळाव्यासह शासकीय योजनांचा लाभ घ्यावा

## रोजगार व उद्योजकता अधिकारी राजेश धर्माधिकारी : भोर येथे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित 'लोकसंवाद' उपक्रमात युवकांना मार्गदर्शन

■ पुणे (दै. संध्या)

युवकांनी रोजगाराच्या उपलब्ध संधींचा लाभ घेण्यासाठी रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासोबतच कौशल्यविकास, प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगारासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. रोजगारासाठी संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व, मुलाखतीला सामोरे जाण्याची पद्धत आणि स्वतःचे प्रभावी सादरीकरण यांनाही महत्त्व आहे. यासाठी रोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यातील तालुकास्तरावरील प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) युवकांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे, असे रोजगार व उद्योजकता अधिकारी राजेश धर्माधिकारी यांनी सांगितले. जय हनुमान गणेश मंडळ, भेलेकरवाडी, ता. भोर येथे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित लोकसंवाद उपक्रमात युवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जय हनुमान गणेश मंडळ, भेलेकरवाडीचे अध्यक्ष विशाल कंक, माजी अध्यक्ष धीरज दानवले, मंडळ अधिकारी सी. पी. जगताप, ग्राम महसूल अधिकारी विवेक भालेराव उपस्थित होते.




येत्या २९ सप्टेंबर रोजी कौशल्य विकास विभागातर्फे रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. युवकांनी आपल्या पात्रतेनुसार सहभागी होऊन रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा. तसेच, बेरोजगारांनी rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन रोजगार व उद्योजकता अधिकारी राजेश धर्माधिकारी यांनी केले. रोजगार मेळाव्यात विविध कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असून, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस क्षेत्रात संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. पदवीधर, आयटीआय तसेच विविध कौशल्याधारित पात्रता असलेल्या युवकांनी आपल्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. रोजगार मेळाव्यापूर्वी संबंधित आयटीआयमध्ये युवकांना मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मुलाखतीला सामोरे जाण्याची पद्धत, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, वेशभूषा आणि स्वतःचे प्रभावी सादरीकरण याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. युवकांनी क्यूआर कोडच्या माध्यमातून नोंदणी करून या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. युवकांनी कौशल्य प्रशिक्षण, रोजगार मार्गदर्शन, अप्रेंटिसशिप तसेच स्वयंरोजगारासाठी उपलब्ध शासकीय योजनांची माहिती घेऊन पात्रतेनुसार अर्ज करावा. स्वतःचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या युवकांनी संबंधित विभागाकडून कर्ज, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि उपलब्ध शासकीय सुविधांची माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

रोजगार मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि कौशल्यवृद्धीमुळे भविष्यात अधिक चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे युवकांनी रोजगार मेळावा, कौशल्य प्रशिक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ घेऊन आपली रोजगारक्षमता वाढवावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. रोजगार, प्रशिक्षण किंवा शासकीय योजनांबाबत शंका असल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून माहिती घ्यावी आणि उपलब्ध योजनांमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित लोकसंवाद उपक्रमाबाबत माहिती अधिकारी गणेश फुंदे यांनी माहिती दिली. मंडळ अधिकारी सी. पी. जगताप यांनी प्रास्ताविक केले. यावेळी गणेश मंडळाचे पदाधिकारी, युवक, युवती, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संयोजन जितेंद्र खंडागळे, रावजी बांबळे यांनी केले.

### कापूरहोळ येथे लोकसंवाद

कापूरहोळ, ता. भोर येथे जिल्हा माहिती कार्यालयाच्या लोकसंवाद उपक्रमांतर्गत वीर धाराव माता मित्र मंडळ, कापूरहोळ येथे रोजगार व उद्योजकता अधिकारी श्री. राजेश धर्माधिकारी यांनी युवकांना कौशल्य विकास विभागाच्या विविध योजना, प्रशिक्षण व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच, येत्या २९ सप्टेंबर रोजी आयोजित रोजगार मेळाव्यात युवकांनी सहभागी होऊन उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी पंकज भाबीगाडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे

### गर्भावस्थेत गंभीर हृदयविकाराचे निदान

- मणिपाल हॉस्पिटलमध्ये आई आणि बाळाचे प्राण वाचवण्यात यश
- हृदयविकाराचा पूर्वइतिहास नसलेल्या महिलेच्या हृदयाची पंपिंग क्षमता अवघी २४ टक्के
- वेळेवर उपचार आणि तज्ज्ञांच्या समन्वयातून सुरक्षित प्रसूती

पुणे : दैनिक संध्या

मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील डॉक्टरांनी हृदयविकाराचा कोणताही पूर्वइतिहास नसलेल्या ३१ वर्षीय महिलेच्या गर्भावस्थेदरम्यान गंभीर हृदयविकाराचे निदान करून तिच्यावर यशस्वी उपचार केले. गर्भावस्थेच्या ३४व्या आठवड्यात तिला सौम्य स्वरूपाचा श्वास लागणे, हृदयाची धडधड वाढणे आणि अस्वस्थता जाणवू लागली. सुरुवातीला ही लक्षणे गर्भावस्थेच्या शेवटच्या टप्प्यातील सामान्य बदलांशी संबंधित असावीत असे वाटत असले, तरी लक्षणांमध्ये झालेला बदल लक्षात घेऊन पुढील तपासण्या करण्यात आल्या. तपासणीत तिच्या हृदयाची कार्यक्षमता गंभीररीत्या कमी झाल्याचे आढळले. हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता दर्शविणारे लेफ्ट व्हेंट्रिक्युलर इजेक्शन फ्रॅक्शन अवघे २४ टक्के होते. तिची प्रकृती लक्षात घेऊन तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि कार्डिओलॉजी, स्त्रीरोग व प्रसूती, क्रिटिकल केअर आणि कार्डियाक अ‍ॅनेस्थेशिया तज्ज्ञांच्या समन्वयाने उपचार सुरू करण्यात आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सी-सेक्शनद्वारे प्रसूती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर महिलेने २.६ किलो वजनाच्या निरोगी मुलीला जन्म दिला. पेरिपार्टम कार्डिओमायोपॅथी हा गर्भावस्थेच्या शेवटच्या काळात किंवा प्रसूतीनंतर उद्भवणारा दुर्मिळ हृदयविकार आहे. भारतातील एका अभ्यासानुसार, दर १,५४१ जिवंत जन्मांमागे साधारण एका महिलेमध्ये हा आजार आढळतो. याच अभ्यासानुसार, इजेक्शन फ्रॅक्शन ३० टक्क्यांपेक्षा कमी असल्यास मातेला गंभीर गुंतागुंतीचा धोका वाढतो. या रुग्णाचे इजेक्शन फ्रॅक्शन केवळ २४ टक्के असल्याने तिच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि वेळेवर उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे होते. या प्रकरणाबाबत माहिती देताना मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील कंसल्टंट गायनॅकॉलॉजिस्ट डॉ. स्वाती गागरे म्हणाल्या, “ही रुग्ण गर्भधारणेपूर्वीपासूनच नियमित वैद्यकीय देखरेखीखाली होती आणि तिची गर्भावस्था सुरुवातीपासून सामान्यपणे सुरू होती. मात्र, गर्भावस्थेच्या ३४व्या आठवड्यात तिला श्वास लागणे आणि हृदयाची धडधड वाढणे अशी लक्षणे जाणवू लागली. गर्भावस्थेच्या शेवटच्या टप्प्यात अशी लक्षणे अनेकदा सामान्य मानली जातात. मात्र, या रुग्णाच्या लक्षणांमध्ये झालेला बदल आणि श्वास घेण्यास जाणवणारा त्रास लक्षात घेऊन आम्ही पुढील तपासणी करण्याचा निर्णय घेतला.”

## गणेशोत्सवात, छेडा'स ची नवी मोदक रेंजही पुणेकरांचं वेधून घेते लक्ष




■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सवामुळे सध्या पुण्याच्या रस्त्यांवर उत्साहाचं वातावरण आहे. याच उत्सवी माहोलात छेडा'स ची नवी मोदक रेंजही पुणेकरांचं लक्ष वेधून घेत आहे. हा उपक्रम छेडा'स च्या पॅकेज्ड मिठाईच्या रेंजचा विस्तार करण्याच्या दिशेने आहे. गणेशोत्सवासाठी तयार केलेल्या या रेंजमध्ये २१ पीसचा केशर मोदक पॅक आणि ११ पीसचा असॉर्टेड मोदक पॅक आहे. असॉर्टेड पॅकमध्ये मलाई, केसर आणि गुलाब हे फ्लेवर्स आहेत. गणपतीचा नैवेद्य, कुटुंबासोबत वाटण्यासाठी किंवा सणानिमित्त भेट देण्यासाठी ही रेंज तयार करण्यात आली आहे. यंदा छेडा'स ने मोदकांची ही रेंज केवळ स्टोअर्सपुरती मर्यादित न ठेवता थेट पुण्याच्या रस्त्यांवर आणली आहे. इलेक्ट्रिक बसेसवरील फुल-रॅप ब्रँडिंगमुळे शहराच्या विविध भागांतून प्रवास करणाऱ्या पुणेकरांना ही रेंज सहज नजरेस पडत आहे. बस स्टॉप्स आणि प्रमुख आउटडोअर ठिकाणांवरील ब्रँडिंगमुळे या उपक्रमाला आणखी मोठी दृश्यमानता मिळत आहे. पुण्यातील हा उपक्रम छेडा'स च्या महाराष्ट्रभर सुरू असलेल्या गणेशोत्सव मोहिमेचा भाग आहे. मुंबईत ब्रँड पहिल्यांदाच लालबागचा राजा उत्सवाशी जोडला गेला आहे. जुहू येथे उभारण्यात आलेले मोदकाच्या बॉक्सचे उघडणे आणि बंद होणे दाखवणारे आकर्षक कायनेटिक आउटडोअर देखील सध्या लक्ष वेधून घेत आहे. नाशिकमध्येही छेडा'स ने नाशिकचा राजा उत्सवाशी पहिल्यांदाच जोडत आपल्या गणेशोत्सवातील उपस्थितीचा विस्तार केला आहे. पुण्यातील या उपक्रमातून छेडा'स ने मोदकांना दुकानाच्या शेल्फपलीकडे थेट शहराच्या रस्त्यांवर आणलं आहे यंदाच्या गणेशोत्सवात छेडा'स चे मोदक अक्षरशः शहरभर फिरत आहेत.

## पुण्यात प्रीमियम नेत्रसेवा सुविधांचा विस्तार

### फिनिक्स मार्केटसिटीमध्ये आकाश आयचे झाइस व्हिजन सेंटर सुरू

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील नेत्रसेवा क्षेत्रातील आघाडीचे आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरने झाइस इंडियाच्या सहकार्याने फिनिक्स मार्केटसिटी येथे झाइस व्हिजन सेंटर बाय आकाश आय सुरू केले आहे. या केंद्राच्या उद्घाटनामुळे पुण्यातील झाइस व्हिजन सेंटरची संख्या चार झाली असून, नेत्रसेवा किरकोळ विक्री केंद्राच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले हे शहरातील पहिले झाइस व्हिजन सेंटर आहे. पुण्यात २५ वर्षांहून अधिक काळ नेत्रसेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरने सुरू केलेल्या या केंद्रात झाइसच्या अचूक प्रकाशिकी तंत्रज्ञानासह प्रगत दृष्टीसेवा उपाय आणि आकाश आयची नेत्रसेवेतील तज्ज्ञता एकत्रित करण्यात आली आहे. ग्राहकांच्या दृष्टीविषयक गरजा, जीवनशैली आणि दैनंदिन वापर लक्षात घेऊन वैयक्तिक सल्लामसलत आणि योग्य दृष्टीसेवा उपाय उपलब्ध करून देण्यावर केंद्राचा भर आहे. फिनिक्स मार्केटसिटीमधील जी२३, तळमजला, बोसजवळ आणि युनिक्लोसमोर, फिनिक्स अव्हेन्यू ऑफ स्टार्स, पुणे-नगर रोड, विमान नगर येथे सुमारे १,८०० चौरस फुटांच्या जागेत हे केंद्र उभारण्यात आले आहे. आधुनिक आणि दर्जेदार वातावरणात ग्राहकांना दृष्टीसेवेचा अनुभव मिळावा, या दृष्टीने केंद्राची रचना करण्यात आली आहे. या केंद्राच्या उद्घाटनाबाबत आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरचे मालक डॉ. विठ्ठल सातव म्हणाले, “झाइसच्या प्रगत दृष्टीसेवा तंत्रज्ञानाला आमच्या नेत्रसेवेतील अनुभवाची जोड देऊन ग्राहकांना अधिक चांगला आणि वैयक्तिक अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुण्यातील ग्राहकांच्या बदलत्या दृष्टीविषयक गरजा लक्षात घेऊन या केंद्राची उभारणी करण्यात आली आहे.”



पुण्यातील चौथे झाइस व्हिजन सेंटर आणि आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरने सुरू केलेले पहिले झाइस व्हिजन सेंटर म्हणून या केंद्रातून पुण्यातील ग्राहकांना वैयक्तिकृत दृष्टीसेवा आणि झाइसच्या प्रगत दृष्टीसेवा उपायांचा लाभ घेता येणार आहे. फिनिक्स अव्हेन्यू ऑफ स्टार्स, फिनिक्स मार्केटसिटी, पुणे येथे हे केंद्र आता ग्राहकांसाठी खुले झाले आहे.

झाइस इंडियाचे भारत व शेजारील बाजारपेठांसाठी दृष्टीसेवा विभागाचे व्यवसाय प्रमुख रोहन पॉल म्हणाले, “तंत्रज्ञान, अचूकता आणि वैयक्तिक ग्राहक अनुभवाला महत्त्व देणाऱ्या भागीदारांसोबत काम करून उच्च दर्जाची दृष्टीसेवा अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरसोबत पुण्यात झाइस व्हिजन सेंटरचा अनुभव उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. या केंद्रामधून ग्राहकांना झाइसच्या प्रगत दृष्टीसेवा उपायांसोबत वैयक्तिक सल्लामसलतीचा लाभ सोयीस्कर वातावरणात घेता येईल.” या केंद्रामध्ये विविध दृष्टीविषयक गरजा आणि जीवनशैलीनुसार विकसित केलेल्या झाइसच्या लेन्स रचना आणि दृष्टीसेवा तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध असेल. वैयक्तिक सल्लामसलतीच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन गरजांशी सुसंगत दृष्टीसेवा उपाय निवडण्यास मदत केली जाणार आहे.

## २१ हजार पाणीपुरींपासून साकारला १३ फूटी गणपती बाप्पा

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वांसाठीच मोठ्या आनंदाचा उत्सव. मात्र ज्यांच्या नावातच 'गणेश' आहे, अशा गणेश भेळने यंदा अतिशय अनोखा व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे योजले आहे. पाणीपुरीच्या २१ हजार पुऱ्यांचा वापर करुन १३ फूट उंच आणि १० फूट रुंद असा आगळावेगळा गणपती साकारला आहे. नामदार गोखले पथावरील (फर्ग्युसन रस्ता) गणेश भेळच्या दालनाबाहेर ही मूर्ती उभारण्यात आली आहे. गणेश भेळचे संस्थापक रमेश गुडमेवार व छाया गुडमेवार यांच्या हस्ते या मूर्तीचे अनावरण करण्यात आले. यावेळी संचालक रुपेश गुडमेवार, दिनेश गुडमेवार व अनुष्का गुडमेवार उपस्थित होते.

मूर्तीवरील या पुऱ्या १२ दिवस आहेत, तशाच राहाव्यात यासाठी विशेष काळजी घेण्यात आली आहे. अशाप्रकारे अनोख्या रितीने गणपती साकारण्याचे यंदाचे चौथे वर्ष असून, दरवर्षी वेगळी संकल्पना घेऊन गणेश भेळ ग्राहकांसमोर येत असते. ही मूर्ती तयार करण्यासाठी मागील दोन महिन्यांपासून तयारी सुरू होती. या सर्व पुऱ्या आपल्या कारखान्यात तयार करण्यात आल्या आहेत. तर कलाकार प्रशांत साळुंखे यांनी ही मूर्ती प्रत्यक्षात साकारली आहे. या पुऱ्या तयार करण्यासाठी वाया जाणाऱ्या/उरलेल्या पिठाचा पुनर्वापर करण्यात आला आहे. तसेच मूर्तीच्या संरचनेसाठी बांबू आणि कागदासारख्या नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यात आला आहे.



पुनर्वापर आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून पर्यावरणपूरक संदेश देण्याचा हा गणेश भेळचा प्रयत्न आहे, असे रुपेश गुडमेवार यांनी सांगितले. नागरीकांच्या प्रतिसादामुळेच आम्हाला असे काही करण्याची प्रेरणा मिळते, असेही त्यांनी नमूद केले. संचालक दिनेश गुडमेवार म्हणाले, "आमच्यासाठी ‘गणेश’ हे नाव केवळ आमच्या व्यवसायाचे नाव नाही, तर आमच्या आयुष्याशी जोडलेले एक नात आहे. आमच्या हातातल्या पाणीपुरीची प्रत्येक पुरी आमच्यासाठी फक्त एक पुरी नव्हती, तर त्या प्रत्येक पुरीत आम्हाला ‘गणेश’ दिसत गेला. १९७८ मध्ये आमचे वडील रमेश गुडमेवार आणि आई श्रीमती छाया रमेश गुडमेवार यांनी पुण्यात एका साध्या हातगाडीपासून गणेश भेळची सुरुवात केली. अस्सल चव, उत्तम गुणवत्ता आणि ग्राहकांचे समाधान या मूल्यांवर सुरू झालेला हा छोटासा व्यवसाय आज पुण्याच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीतील एक लोकप्रिय आणि विश्वासार्ह ब्रँड म्हणून नावारूपाला आला आहे."

## महारेराचा ‘अ‍ॅक्वारा बिल्डर्स’ला दणका

### अ‍ॅक्वारा प्राइडमधील चार सदनिकाधारकांना विलंब व्याज देण्याचे आदेश

■ पुणे (दै. संध्या)

वडगाव बुद्रुक येथील ‘अ‍ॅक्वारा प्राइड’ या गृहप्रकल्पातील सदनिकांचा ताबा देण्यास झालेल्या विलंबाप्रकरणी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) अ‍ॅक्वारा बिल्डर अँड डेव्हलपर प्रा. लि.ला चार सदनिकाधारकांना विलंबाचे व्याज देण्याचे आदेश दिले आहेत. महारेरा सदस्य महेश पाठक यांनी नुकताच हा आदेश दिला. ‘अ‍ॅक्वारा प्राइड’ प्रकल्पाची महारेरा नोंदणी क्रमांक P52100031863 असून, सी विंगमधील ४०६, ५०५, ५०९ आणि ५११ क्रमांकाच्या सदनिकांशी संबंधित चार तक्रारी महारेराकडे दाखल करण्यात आल्या होत्या. संबंधित करारांनुसार सदनिकांचा ताबा ६ सप्टेंबर २०२५ रोजी देणे अपेक्षित होते. मात्र, मुदत उलटूनही ताबा मिळाला नसल्याने सदनिकाधारकांनी ताब्यासह व्याज, भरपाई आणि खर्चाची मागणी केली होती. प्रकल्पाला विलंब होण्यामागे नैसर्गिक वायू व बांधकाम साहित्याची टंचाई, पुरवठा साखळीतील अडथळे, मनुष्यबळाची कमतरता तसेच युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम झाल्याचा दावा विकासकाने केला. प्रकल्पाची मुदत ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याचेही विकासकाने सांगितले होते. दरम्यान, महारेराच्या आदेश क्रमांक ६६/२०२६नुसार संबंधित प्रकल्पाला चार महिन्यांची मुदतवाढ लागू असल्याचे प्राधिकरणाने नमूद केले. त्यामुळे ६ सप्टेंबर २०२५ ही ताब्याची मुदत चार महिन्यांनी वाढवून ६ जानेवारी २०२६ करण्यात आली. मात्र, या वाढीव मुदतीतही ताबा न दिल्याने ७ जानेवारी २०२६पासून प्रत्यक्ष ताबा आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) देईपर्यंत व्याज देण्याचे आदेश महारेराने दिले. हे व्याज प्रत्यक्ष भरलेल्या सदनिकेच्या रकमेवर एसबीआयच्या एमसीएलआरपेक्षा दोन टक्के अधिक दराने देण्याचे निर्देश आहेत. स्वतंत्र भरपाईची मागणी मात्र महारेराने फेटाळली आहे. तसेच पूर्ण ओसी मिळाल्यानंतर व्याजाची रक्कम देण्याची मुभा विकासकाला देण्यात आली असून, ती रक्कम सदनिकाधारकांच्या थकीत देयकांमध्ये समायोजित करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.




362 काशेवाडी भवानी पेठ येथील रहिवासी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे पुणे शहर संघटक सचिव विक्रम कैलास पवळे यांनी त्यांच्या घरातील गणपती जवळ कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराचा भव्य हा देखावा बनवला. विक्रम कैलास पवळे हे दरवर्षी आपल्या घरातील गणपती जवळ विविध देखावे करत असतात या वर्षी त्यांनी बनवलेला कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिराचा भव्य हा भवानी पेठ काशेवाडी भागातील नागरीकांना आकर्षणाचे केंद्र ठरत असून हा देखावा पाहण्यास नागरीकांची गर्दी होत आहे. यावेळी गौरी विक्रम पवळे, आदित्य विक्रम पवळे, जय कैलास पवळे, यांनी देखाव्यासाठी परिश्रण घेतले.



## आदिवासी बांधवांपर्यंत योजनांचा थेट लाभ पोहोचविण्याचा संकल्प

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या ‘सेवा संकल्प अभियान २०२६’ अंतर्गत दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांपर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती व प्रत्यक्ष लाभ पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या अभियानाचा शुभारंभ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव येथे करण्यात आला.




अभियानाच्या शुभारंभानिमित्त प्रकल्प कार्यालयापासून पंचायत समिती चौकमार्गे शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळेपर्यंत ‘सेवा यात्रा’ स्वरूपात प्रभात फेरी काढण्यात आली. ढोल-ताशे, लेझीम पथक, पारंपरिक वेशभूषा आणि योजनांची माहिती देणारे फलक यामुळे जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले. या फेरीत ५०० हून अधिक आदिवासी बांधव, महिला बचत गटांच्या सदस्या, विद्यार्थी तसेच अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले. यानंतर आयोजित आदिवासी मेळाव्यात वनहक्क कायदा, शबरी महामंडळाच्या स्वयंरोजगार योजना, राणी दुर्गावती महिला बचत गट सबलीकरण, न्यूक्लियस बजेट व डीबीटी योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी १२ पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पेसा दाखल्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते, पंचायत समिती आंबेगावच्या उपसभापती ज्योती पारधी, माजी जिल्हा परिषद सदस्य देवराम लांडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, सुकाळवेडे ग्रामपंचायतीचे सरपंच दत्ता गवारी, माजी जिल्हा परिषद सदस्या जनाबाई उगले, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रियंका घनवट, संदीप पाटील व रवींद्र माळवे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. अभियानांतर्गत दुर्गम भागातील आदिवासी पाडे व वस्त्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी ध्वनिक्षेपकासह विशेष प्रचार रथ फिरविण्यात येत आहे. वनहक्क, शबरी महामंडळ, राणी दुर्गावती महिला बचत गट, डीबीटी व न्यूक्लियस बजेट आदी योजनांची माहिती देणारी पत्रकेही वितरित करण्यात येत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अपोलो हॉस्पिटल्सने पेरिटोनियल सरफेस मॅलिग्नन्सी क्लिनिक सुरू केले

**पुणे : दैनिक संध्या**

पेरिटोनियम (उदर पोकळीला अस्तर देणारी आणि पोट, आतडी व यकृत यांसारख्या अवयवांना झाकणारी पातळ झिल्ली) येथील जटिल कर्करोगाचा सामना करणाऱ्या रुग्णांसाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी योग्य उपचाराची दिशा अनेकदा योग्य तज्ज्ञ टीम शोधण्यापासून सुरू होते. अपोलो हॉस्पिटल्स पुणेने आज आपल्या पेरिटोनियल सरफेस मॅलिग्नन्सी क्लिनिकच्या शुभारंभाची घोषणा केली. हे महाराष्ट्रातील जटिल पेरिटोनियल सरफेस मॅलिग्नन्सी असलेल्या रुग्णांच्या तज्ज्ञ मूल्यांकन आणि व्यवस्थापनासाठी समर्पित पहिले क्लिनिक आहे. हे क्लिनिक प्रिसिजन-आधारित, बहुविषयक उपचार प्रणाली म्हणून विकसित करण्यात आले आहे. यामध्ये तज्ज्ञ रुग्ण निवड, ट्यूमर बोर्ड पुनरावलोकन, साइटोरिडक्टिव्ह सर्जरी, निवडक रुग्णांसाठी हायपरथर्मिक इंट्रापेरिटोनियल केमोथेरपी, प्रगत इंट्रापेरिटोनियल उपचारपद्धती, पुनर्वसन आणि सर्व्हायव्हरशिप सपोर्ट यांचा समावेश आहे. क्लिनिकमध्ये विविध प्रकारच्या पेरिटोनियल सरफेस मॅलिग्नन्सीचा समावेश आहे. यामध्ये अपेंडिसियल ट्यूमर आणि स्यूडोमायक्सोमा पेरिटोनी, पेरिटोनियल मेटास्टेसिससह कोलोरेक्टल कर्करोग, ओव्हेरियन/फॅलोपियन ट्यूब/प्रायमरी पेरिटोनियल कर्करोग, पेरिटोनियल मेसोथेलिओमा, पेरिटोनियल मेटास्टेसिस असलेले निवडक गॅस्ट्रिक कर्करोग आणि पुनरावृत्ती होणारे पेरिटोनियल आजार यांचा समावेश आहे. "पेरिटोनियल सरफेस मॅलिग्नन्सी क्लिनिक हे एका महत्त्वाच्या तत्त्वावर आधारित आहे.

### भविष्याच्या दिशेने एक पाऊल

**नवी दिल्ली : दैनिक संध्या**

Ai+ ने नोव्हा 2सिरीज मधील नवीनतम स्मार्टफोन नोव्हा 2 पॉवर 5G लॉंच केला आहे. अत्याधुनिक डिझाइन, विश्वासार्ह कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी पॉवर यांचा संगम असलेला हा स्मार्टफोन तंत्रज्ञानप्रेमी नव्या पिढीच्या गरजा लक्षात घेऊन सादर करण्यात आला आहे. पारंपरिक स्मार्टफोन लॉन्चच्या पद्धतीपेक्षा वेगळ्या आणि अनोख्या पद्धतीने, नोव्हा 2 पॉवर ने नवी दिल्लीतील रॅम्पवर पदार्पण करत फॅशन आणि तंत्रज्ञानाचा सुरेख संगम सादर केला. आधुनिक रॅम्प लुक्समध्ये हा स्मार्टफोन समाविष्ट करण्यात आला होता, ज्यातून तो केवळ तंत्रज्ञानाचे उपकरण नसून स्टायलिश ॲक्सेसरी म्हणूनही आपली ओळख अधोरेखित करतो. "डिझाइन टू इन्स्पायर. पॉवर टू आउटलास्ट" म्हणजेच प्रेरणादायी डिझाइन. दीर्घकाळ टिकणारी पॉवर या ब्रीदवाक्यावर आधारित नोव्हा 2 पॉवर मध्ये स्मार्टफोनच्या अनुभवाच्या केंद्रस्थानी डिझाइनला स्थान देण्यात आले आहे. त्याचबरोबर, ग्राहकांच्या अपेक्षांनुसार कार्यक्षमता आणि टिकाऊपणा देखील या स्मार्टफोनमध्ये देण्यात आला आहे.



### अजितदादांचे स्मारक उभारण्यावरती सर्वांचे एकमत

- मंगल कार्यालय बांधण्याचीही सभासदांची मागणी
- सोमेश्वर कारखान्याची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**सोमेश्वरनगर : दैनिक संध्या**

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत मांडण्यात आलेले सर्व विषय सभासदांनी सर्वानुमते मंजूर केले.यावेळी अजितदादांचे स्मारक उभारण्यावरती सर्वांचे एकमत झाले.कारखान्याच्या परिसरात अजितदादांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्यात यावे,अशी भावना व्यवस्थापनाने व्यक्त केली. या मागणीला उपस्थित सभासदांकडून एकमताने पाठिंबा देण्यात आला.तसेच कारखान्याच्या परिसरात सभासद व शेतकऱ्यांच्या विविध कार्यक्रमांसाठी मंगल कार्यालय बांधण्यात यावे,अशी मागणीही सभासदांनी केली.कारखान्याच्या विकासासोबतच सभासदांच्या सोयी-सुविधांकडे लक्ष देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.सभेत कारखान्याशी संबंधित विविध विषयांवर चर्चा झाली.सभासदांनी आपली मते मांडल्यानंतर सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. शिक्षण संस्थेवरती विशेष लक्ष देण्याची गरज असल्याची भावना सभासदांमधून व्यक्त करण्यात आली.सोमेश्वर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया सुरू असल्यामुळे आज होणारी सभा ही वादळी होते की काय असे प्रत्येकाला वाटत होते मात्र खेळीमेळीच्या वातावरणामध्येच आजची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली एक वाजता सुरू झालेली सभा जवळपास साडेसहा वाजता संपली.




# १५ वर्षीय मुलीला कार्डिओजेनिक शॉकमधून वाचवण्यात यश

■ पुणे (दै. संध्या)



आपत्कालीन अतिदक्षता उपचारातील एका उल्लेखनीय प्रकरणात, DPU सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे येथे संशयित फुलमिनंट व्हायरल मायोकार्डायटिसमुळे अचानक आणि गंभीर स्वरूपाच्या हृदयविकाराने ग्रस्त झालेल्या 15 वर्षीय मुलीवर यशस्वी उपचार करण्यात आले. फुलमिनंट व्हायरल मायोकार्डायटिस ही हृदयाच्या स्नायूंना होणारी जीवघेणी दाहक स्थिती असून, त्यामुळे हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता अचानक मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. या मुलीला सुरुवातीला २७ ऑगस्ट रोजी अशक्तपणा जाणवला. त्यानंतर तिला चक्कर येणे आणि उलट्या होण्याचे प्रसंग सुरू झाले. तरीही तिने नियोजित परीक्षा दिली. त्यानंतर तिची प्रकृती अधिक खालावत गेली आणि तिला रिफ्रॅक्टरी कार्डिओजेनिक शॉकची स्थिती निर्माण झाली. त्याच रात्री DPU ECMO टीमला तिच्या रिट्रीव्हल आणि प्रगत जीवनरक्षक उपचारांसाठी तातडीने सक्रिय करण्यात आले. कार्डियाक तज्ज्ञांसह टीम संबंधित रुग्णालयात पोहोचली. रुग्णाची प्रकृती सतत खालावत असल्याने, तिला DPU सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलवण्यापूर्वीच रिट्रीव्हल प्रक्रियेचा भाग म्हणून ECMO सपोर्ट सुरू करण्यात आला.

DPU येथे दाखल होईपर्यंत ती रिफ्रॅक्टरी कार्डिओजेनिक शॉकच्या अत्यंत गंभीर स्थितीत होती. या अवस्थेत हृदयाची कार्यक्षमता आणि रक्तदाब टिकवून ठेवण्यासाठी आक्रमक औषधोपचार करूनही हृदय शरीरातील महत्त्वाच्या अवयवांना आवश्यक तेवढे रक्त पंप करू शकत नाही. पारंपरिक वैद्यकीय उपचारांद्वारे तिची प्रकृती स्थिर होत नसल्याने, DPU ECMO टीमने तातडीने आपत्कालीन कॅन्युलेशन करून VA-ECMO (Veno-Arterial Extracorporeal Membrane Oxygenation) सुरू केले. ECMO ही एक प्रगत जीवनरक्षक उपचारपद्धती आहे. यामध्ये रक्त काही काळासाठी शरीराच्या बाहेर असलेल्या ECMO सर्किटमधून प्रवाहित केले जाते, जिथे त्यामध्ये ऑक्सिजन मिसळला जातो आणि त्यानंतर ते रक्त पुन्हा शरीरात सोडले जाते. VA-ECMO हृदयाच्या पंपिंग क्षमतेला तात्पुरता आधार देऊन शरीरातील महत्त्वाच्या अवयवांपर्यंत रक्तप्रवाह कायम ठेवण्यास मदत करते. त्यामुळे अत्यंत कमकुवत झालेल्या हृदयाला बरे होण्यासाठी आवश्यक वेळ मिळतो. रुग्णाला ८ दिवस ECMO सपोर्ट देण्यात आला. या कालावधीत तिच्या हृदयाच्या कार्यक्षमतेत हळूहळू सुधारणा झाली. त्यामुळे वैद्यकीय पथकाने ECMO सपोर्ट क्रमाक्रमाने कमी केला. ४ सप्टेंबर रोजी तिला यशस्वीरित्या ECMO सपोर्टमधून बाहेर काढण्यात आले आणि डिकॅन्युलेशन करण्यात आले, जे तिच्या उपचारातील एक महत्त्वाचे वळण ठरले. त्यानंतर तिला यशस्वीरित्या व्हेंटिलेटरवरूनही बाहेर काढण्यात आले आणि जवळच्या वैद्यकीय देखरेखीखाली तिची प्रकृती सुधारत राहिली. जवळपास तीन आठवड्यांच्या उपचार आणि पुनर्वसनानंतर, या मुलीला १५ सप्टेंबर रोजी रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. डिस्चार्जच्या वेळी तिची हिमोडायनामिक स्थिती स्थिर होती आणि न्यूरोलॉजिकल स्थितीही सामान्य होती.

**वेळेचे महत्त्व आणि बहुवैद्यकीय पथकाचा समन्वय**

या यशस्वी उपचारातून अतिदक्षता उपचार तज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञ, कार्डियाक सर्जन, कार्डियाक ॲनेस्थेशियोलॉजिस्ट, ECMO तज्ज्ञ, परफ्युजनिस्ट, नर्सिंग आणि इतर सहयोगी आरोग्यसेवा तज्ज्ञ यांच्या समन्वयित आणि बहुवैद्यकीय दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित होते.

## प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि सूर्यभारत इंडस्ट्रियल रिसर्च ज्ञानपीठाचा गौरव

■ मुंबई/पुणे (दै. संध्या)




महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांना राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच सूर्यभारत इंडस्ट्रियल रिसर्च ज्ञानपीठाच्या (एसबीआयआरडी) नाविन्यपूर्ण संशोधन, नवोपक्रम निर्मिती आणि उद्योग विकास क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दलही सन्मान करण्यात आला. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे नुकत्याच आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार 'एसबीआयआरडी'च्या संस्थापक-संचालिका श्रीमती सुषमा चोरडिया यांनी राज्यपालांच्या हस्ते स्वीकारला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'महाराष्ट्र लोकभवन सेवा संकल्प अभियान'अंतर्गत मैत्री पीस फाउंडेशनतर्फे 'नॅशनल एक्सलन्स अवॉर्ड्स' वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना गतिशीलता साधनांचेही वितरण करण्यात आले.

सामाजिक कल्याण व सक्षमीकरणासाठी कार्यरत विविध संस्था, मान्यवर आणि निमंत्रित या समारंभास उपस्थित होते. प्रा. डॉ. चोरडिया यांच्या उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील सुमारे ४५ वर्षांच्या योगदानाचा, मानवी क्षमतांच्या विकासासाठीची बांधिलकी, भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम संस्था उभारण्याचे कार्य आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदान यांचा हा गौरव आहे. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांना 'डिस्टिंग्युश्ड लॉरेट फॉर एज्युकेशनल एक्सलन्स, नेशन बिल्डिंग' या विशेष सन्मानाने गौरविण्यात आले.

## नांदेड सिटीतील आरोग्य शिबिरामध्ये ४०० जणांची तपासणी

### ४० हून अधिक तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध वैद्यकीय तपासण्या व मार्गदर्शन केले

■ पुणे (दै. संध्या)



गणेश उत्सवानिमित्त नांदेड सिटी रेसिडेन्शिअल डॉक्टर्स असोसिएशन आणि रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघ, नांदेड सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड सिटी येथील ॲंफीथिएटर (गणेश मंडप) येथे भव्य निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा नांदेड सिटी, पुणे आणि परिसरातील ४०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, नगरसेवक सुभाष नाण्हेकर, नांदेड सिटी डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष व नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते आणि रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष शिरीष पाटील यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी नांदेड सिटीतील विविध संस्था, सोसायट्या, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात विविध वैद्यकीय शाखांमधील ४० हून अधिक तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. सामान्य आरोग्य तपासणीसह अस्थिरोग, नेत्ररोग, त्वचारोग, मानसोपचार, स्त्रीरोग, आयुर्वेद, दंतचिकित्सा, होमिओपॅथी, कान-नाक-घसा, बालरोग, फिजिओथेरपी आणि आहारविषयक मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय रक्तदाब, रक्तातील साखर, हाडांची घनता तसेच विविध रक्त तपासण्याही करण्यात आल्या. या वेळी डॉ. ऋषिकेश दामले, डॉ. हरीश गोरे, डॉ. वैशाली गोमसाळे, डॉ. विकास क्षीरसागर, डॉ. अनंत शिरुरे, डॉ. रामचंद्र पाडळकर, डॉ. सुशील टिकर, डॉ. व्यंकट जांभळे, डॉ. वैशाली गोसावी, डॉ. शशांक खेडकर, डॉ. गौरी पंडितराव यांच्यासह विविध वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी तसेच रामचंद्र मिशनच्या विजयाताई लोणकर यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैशाली गोमसाळे आणि डॉ. वैशाली गोसावी यांनी केले, तर डॉ. ऋषिकेश दामले यांनी आभार मानले. विविध वैद्यकीय शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम नागरिकांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि तपासणीच्या दृष्टीने उपयुक्त ठरला. नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## एथर एनर्जीची संस्थांशी भागीदारी

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दोन-चाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या एथर एनर्जीने आज छत्रपती संभाजीनगरमधील चार शैक्षणिक आणि कौशल्य-विकास संस्थांसोबत सामंजस्य करार केले. या उपक्रमाचा उद्देश इलेक्ट्रिक वाहन आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासाठी प्रदेशातील टॅलेंट पाइपलाइन मजबूत करणे आहे. सामंजस्य करार आंतरराष्ट्रीय सेंटर ऑफ एक्सलन्स इन इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, आयएसआयईइंडिया प्रायव्हेट लिमिटेड, यशोदीप नॉलेज हब आणि जिजामाता आयटीआय, शेवगाव यांच्यासोबत करण्यात आले. एथरने प्रदेशात ऑरिक येथे नवीन सुविधा उभारून आपला मॅन्युफॅक्चरिंग विस्तार सुरू केला आहे. या उपक्रमाचा उद्देश त्या सुविधेला आणि त्याभोवतीच्या औद्योगिक इकोसिस्टमला आधार देण्यासाठी आवश्यक कुशल वर्कफोर्स तयार करणे आहे. सामंजस्य करार अंतर्गत एथर या चार संस्थांसोबत ईव्ही-केंद्रित अभ्यासक्रम डिझाइन, फॅकल्टी डेव्हलपमेंट, तांत्रिक प्रशिक्षण आणि इंडस्ट्री-लिंक्ड प्रॅक्टिकल लर्निंगवर काम करेल. विद्यार्थी आणि फॅकल्टी यांना एथरच्या तांत्रिक आणि उत्पादन टीम्ससोबत काम करून ईव्ही टेक्नॉलॉजीज आणि आधुनिक उत्पादन पद्धतींचा अनुभव मिळेल. यात उदयोन्मुख ईव्ही टेक्नॉलॉजीज, मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेसेस, सेफ्टी आणि क्वालिटी प्रॅक्टिसेस यांचा समावेश असेल.

एथर एनर्जीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर संजीव कुमार सिंह म्हणाले,"जेव्हा तुम्ही उत्पादन सुविधा उभारत असता, तेव्हा तुम्ही त्याभोवती एक इकोसिस्टमही उभारत असता आणि टॅलेंट हा त्याचा केंद्रबिंदू असतो. छत्रपती संभाजीनगरमध्ये शैक्षणिक संस्थांचा मजबूत पाया आणि उत्साही तरुण आहेत, त्यामुळे आम्ही सुरुवातीपासूनच त्यांच्यासोबत काम करायचे ठरवले. हे एमओयू इंडस्ट्री आणि अकॅडेमिया यांना अधिक जवळ आणतात, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान प्रत्यक्ष उत्पादन वातावरणात कसे वापरले जाते याचे स्पष्ट चित्र मिळते आणि संस्थांना व फॅकल्टीला इंडस्ट्रीला आवश्यक असलेल्या क्षमतांचा अधिक अनुभव मिळतो. आमच्यासाठी एथरमध्ये, हे संस्थांशी आणि विद्यार्थ्यांशी थेट संवादाचे माध्यम उघडते, ज्यामुळे आम्हाला त्यांच्या आकांक्षा समजतात आणि इंडस्ट्री या टॅलेंटला खरोखर काय हवे आहे त्यानुसार स्वतःला जुळवून घेऊ शकते, उलट नाही. कालांतराने हे प्रदेशासाठी आणि व्यापक मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टमसाठी मजबूत टॅलेंट पूल तयार करू शकते."



एथर एनर्जीच्या चीफ ह्युमन रिसोर्सेस ऑफिसर सुरभी लोशाली म्हणाल्या, "एथर आपला मॅन्युफॅक्चरिंग विस्तार करत असताना योग्य टॅलेंट पाइपलाइन तयार करणे हे सुविधा उभारण्याइतकेच महत्त्वाचे आहे.

या भागीदाऱ्या आम्हाला विद्यार्थी आणि फॅकल्टीसोबत लवकर संवाद साधण्याची संधी देतात, अभ्यासक्रम खऱ्या इंडस्ट्री गरजांनुसार घडवतात आणि ईव्ही क्षेत्रात अर्थपूर्ण करिअरकडे स्पष्ट मार्ग तयार करतात. हे केवळ आमच्या स्वतःच्या वर्कफोर्समध्ये गुंतवणूक नाही, तर छत्रपती संभाजीनगर आणि प्रदेशातील मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टमच्या दीर्घकालीन कौशल्य तयारीतही गुंतवणूक आहे."

## ग्राहकांनी 'स्मार्ट सोलर' योजनेचा लाभ घ्यावा : दिग्विजय ठोंबरे




■ बारामती (दै. संध्या)

घरगुती वीज ग्राहकांमध्ये सौरऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलार (स्मार्ट) योजनेचा' पात्र ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे सहायक अभियंता दिग्विजय ठोंबरे यांनी केले. साने गुरुजी तरुण मित्र मंडळ, आमराई येथे माहिती व जनसंपर्क विभागामार्फत आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात त्यांनी नागरिकांना योजनेची माहिती दिली. केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर योजनेशी संलग्न असलेल्या या योजनेअंतर्गत पात्र घरगुती ग्राहकांना छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी केंद्रीय आर्थिक सहाय्य मिळते. १ व २ किलोवॅट क्षमतेसाठी प्रति किलोवॅट ३० हजार रुपये, तर ३ किलोवॅटपर्यंतच्या अतिरिक्त क्षमतेसाठी प्रति किलोवॅट १८ हजार रुपये केंद्रीय सहाय्य उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहकांचा सौर प्रकल्प उभारणीवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत होते.सौर प्रकल्प उभारल्यानंतर पाच वर्षे त्याच्या देखभालीची जबाबदारी महावितरणमार्फत नियुक्त सेवा पुरवठादाराकडे राहते. पात्र ग्राहकांनी अधिकृत प्रक्रियेद्वारे अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असेही श्री. ठोंबरे यांनी सांगितले. कार्यक्रमास नगरसेवक बिरजू भैया मांढरे आणि गणेश मंडळाचे अध्यक्ष प्रथमेश अर्जुन काशीद उपस्थित होते.

# डीपीजीयूमध्ये करिअर एक्स्पो २०२६चे आयोजन

■ पिंपरी, पुणे (दै. संध्या)




डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, पुणे यांच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DPGU) आणि डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील कॅम्पसमध्ये 'करिअर एक्स्पो २०२६'चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात २० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी आणि उद्योगविश्वाच्या अपेक्षा समजून घेण्यासाठी एकाच व्यासपीठावर संधी मिळाली. इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, फार्मसी, लॉ, एज्युकेशन, नर्सिंग, आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स अशा विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी एक्स्पोला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळी ८ वाजता रिबन कटिंग सोहळ्याने एक्स्पोची सुरुवात झाली. विद्यापीठ व संस्थेचे वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. नोंदणीद्वारे विद्यार्थ्यांना एक्स्पोमध्ये सहभागी होता आले. विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधत विद्यार्थ्यांनी उपलब्ध पदे, आवश्यक कौशल्ये, भरती प्रक्रिया आणि उद्योगाच्या अपेक्षांबाबत माहिती घेतली. अनेक विद्यार्थ्यांना थेट मुलाखती आणि करिअरविषयक संवादाची संधी मिळाली. विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग आणि उत्साह यामुळे कॅम्पसमध्ये दिवसभर करिअरविषयक सकारात्मक वातावरण निर्माण झाले. यावेळी बोलताना डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्रो-चॅन्सलर, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DPGU), डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, पुणे, म्हणाले, "विद्यार्थ्यांनी केवळ पदवी घेऊन बाहेर पडू नये, तर त्यांच्या भविष्यासाठी स्पष्ट दिशा आणि आत्मविश्वास असावा, हा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. करिअर एक्स्पो हा त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. विद्यार्थी आणि उद्योगविश्वाला एका व्यासपीठावर आणल्यामुळे शैक्षणिक ज्ञान आणि प्रत्यक्ष उद्योगाच्या अपेक्षांमधील दरी कमी करण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह पाहून आनंद झाला असून, या एक्स्पोमधून अनेक विद्यार्थ्यांना निश्चितच चांगल्या संधी मिळतील, असा विश्वास आहे."


## ग्रामपंचायत कार्यालय ओतूर

पंचायत समिती जुन्नर, जिल्हा परिषद पुणे

पेपर निविदा सूचना

सरपंच, ग्रामपंचायत ओतूर. ता. जुन्नर, जि. पुणे. हे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या निविदा मागवीत आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निवेदन स्वीकारण्याचा कालावधी दि. २२/०९/२६ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून दि. २८/०९/२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | कंत्राटदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | रामकृष्ण हरी चौक ५ लक्ष आवळी रोड ते मुंजे वाडी स्ट्रीट लाईट करणे. | ५ लक्ष/- | सूट | सुट | ६ महिने | शासकीय अधि., उ.उ.व का. विभागक्र., सूविनी. २०१९/प्र.क्र.८५/उर्जा -५ दिनांक २ ऑगस्ट -२०१९ द्वारे प्राधिकृत विद्युत ठेकेदार |

टीप :- १) सदर कामाबाबत निविदा, अटी व शर्ती इ.बाबतचा सर्व तपशील ग्रामपंचायत कार्यालय ओतूर येथे पहावयास मिळेल.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत ओतुर ता. जुन्नर, जि.पुणे

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत ओतुर ता. जुन्नर, जि.पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे



### उन्नतीच्या ‘स्वर निनाद’ मैफिलीने जिंकली रसिकांची मने

पिंपळे सौदागर : दैनिक संध्या

सामाजिक आणि राजकीय बांधिलकीसोबतच सांस्कृतिक चळवळीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘स्वर निनाद’ या सुरेल संगीत मैफिलीला परिसरातील रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रविवारी (दि. २०) सायंकाळी उन्नतीच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमात गीतकार, संगीतकार आणि गायिका भारती न्यायाधीश तसेच त्यांच्या शिष्य कलावंतांनी शास्त्रीय, सुगम आणि चित्रपट गीतांचे बहारदार सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. मैफिलीची सुरुवात ‘आले रे गणपती आज दारी रे’ या गणेशस्तवनाने झाली. त्यानंतर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील यमन, भूप, बिहाग, काफी आणि भीमपलास या रागांतील बंदिशी सादर करण्यात आल्या. अभिजात संगीताच्या सुरेल प्रवाहानंतर सुगम आणि चित्रपट गीतांनी कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली. कार्यक्रमाचा समारोप भारती न्यायाधीश यांनी सादर केलेल्या ‘वंदे मातरम्’ या गीताने झाला. या मैफिलीचे विशेष आकर्षण म्हणजे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विधी समिती सदस्या व नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे यांनी संत तुकाराम महाराजांची ‘ओंकार प्रधान रूप गणेशाचे’ ही रचना सादर करून आपल्या व्यक्तिमत्त्वातील कलागुणांची झलक रसिकांना दाखवून दिली. कार्यक्रमात इरा, शौर्यवी, राघवी, ध्वनी, अथर्व, आस्मी, ओजस्वी, पयोधी, सौम्या, गार्गी आणि श्रीयान या बालकलावंतांसह सुलभा माने, प्रभा बसवंते, रेखा देवपूरकर, सुचिता सिदनाळे आणि सुनीता सावळे या ज्येष्ठ महिला शिष्यांनी विविध गाण्यांचे सादरीकरण केले. सर्व कलाकारांना तबल्यावर चैतन्य डांगे यांनी तर संवादीनीवर भारती न्यायाधीश यांनी सुरेख साथसंगत केली. कार्यक्रमाचे निवेदन भामिनी महाले यांनी प्रभावीपणे केले. उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे, पिंपरी चिंचवड कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष विजय भिसे आणि उद्योजक धनंजय भिसे यांच्या हस्ते सहभागी कलावंतांचा सत्कार करण्यात आला. संगीतप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत पार पडलेल्या या मैफिलीने परिसरातील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध केले.



### पिंपरीतील यशादा फ्लोरेंझा सोसायटीत ‘खेळ पैठणीचा’ जल्लोष

पिंपरी : दैनिक संध्या

यशादा फ्लोरेंझा को-ऑप. हौसिंग सोसायटीमध्ये गणेशोत्सवानिमित्त महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला ‘खेळ पैठणीचा – होम मिनिस्टर’ हा मनोरंजनात्मक कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. सोसायटीतील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाचे आयोजन यशादा फ्लोरेंझा सोसायटीचे चेअरमन ॲड. उमेश खंदारे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. प्रसिद्ध कलाकार चंद्रकांत नगरकर यांनी आपल्या खास शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत विविध मनोरंजक खेळ, प्रश्नमंजुषा आणि गंमतीदार उपक्रमांच्या माध्यमातून महिलांचे मनोरंजन केले. त्यांच्या उत्स्फूर्त आणि विनोदी सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमात विशेष रंगत निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी सोनाली खंदारे, ज्योती उदासी, यांनी विशेष परिश्रम घेतले.



### गायन, वादन, नृत्याने रंगला महोत्सव

पिंपरी : दैनिक संध्या

नृत्यांगना नुपूर दैठणकर आणि संतूर वादक निनाद दैठणकर यांची जुगलबंदी आणि इंडियन आयडॉलफेम नंदिनी व अंजली गायकवाड भगिनींच्या शास्त्रीय गायनाने निगडीत रंगला मेघ मल्हार महोत्सव. निगडी येथील नृत्यकला मंदिर संस्थेच्या वतीने ज्ञानप्रबोधिनी विद्यालयात गणेश महोत्सव अंतर्गत मेघ मल्हार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार उमाताई खापरे,ज्येष्ठ नृत्यांगना स्वाती दैठणकर,ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचे प्रमुख मनोज देवळेकर, अतिरिक्त आयुक्त (नी)प्रवीण तुपे,अभिनेत्री अश्विनी मुकादम, नृत्य गुरू तेजश्री अडिगे, नृत्यकला मंदिराचे उपाध्यक्ष अविनाश अडिगे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शास्त्रीय नृत्यामध्ये अविरत योगदान देणाऱ्या अभिनेत्री नुपूर दैठणकर यांना दिवंगत अभिनेत्री अश्विनी एकबोटे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा 'अश्विनी पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.२१ हजार रोख रक्कम, शाल श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. गुरू तेजश्री अडिगे म्हणाल्या कि, पिंपरी-चिंचवड शहरात २०१० पासून सुरू झालेली 'मेघ मल्हार संगीत महोत्सवाची' परंपरा यंदाही कायम ठेवली .बाल कलाकार व युवा कलाकारांना शास्त्रीय संगीत आणि नृत्याची प्रेरणा मिळावी, तसेच या शास्त्रीय कलांचा प्रचार आणि प्रसार व्हावा, यासाठी या महोत्सवाची सुरुवात केली . खापरे म्हणल्या कि, पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये कलाकारांचे मोठे योगदान आहे स्वरसागर, पिं-चिं गणेश महोत्सव सारख्या महोत्सवातून रसिकांची भूक भागवत आहे. गायन नृत्यामुळे ऊर्जा एक वेगळीच ऊर्जा मिळते. घेवून चालतो नेहमी यशस्वी होतो, अविरतपणे नृत्यकला संस्था नृत्य कलेची जोपासना करीत आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. नुपूर म्हणाल्या कि, तेजश्री अडिगे यांनी माझी कला क्षेत्रातील जडण घडणं बघितली, अश्विनी एकबोटे यांच्या नावाने मिळालेला पुरस्कार प्रसाद म्हणून स्वीकारते.पुरस्कारामुळे मला ऊर्जा मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुति कुलकर्णी आणि प्रियांका जोशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता भानुप्रिया दोशी, विना भोसले, दर्शन कुलकर्णी,अनघा ताई यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पिंपरी बाजारात कांदा, लसूण, आले तेजीत

## कांद्याच्या दरात पंधरवड्यात दुप्पट वाढ; आवक मंदावल्याने आले-लसणाचे दरही चढे, पालेभाज्यांचे भाव स्थिर

■ पिंपरी : (दै. संध्या)



पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवार (दि. २०) लसूण, आल्याचे आणि कांद्याचे दर तेजीतच होते. लिंबाची आवक कमी झाल्याने लिंबू २०० रुपये किलो दराने विक्री केली जात होती. आले १०० ते १५० रुपये किलो दर आहे. कांदे ५० - ६० रुपये, लसूण १८० - २०० रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. तर दुधी भोपळा, काकडी, गाजर आणि कारली २५ रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. इतर पालेभाज्या आणि फळभाज्यांचे दर स्थिर होते. पंधरा दिवसांपूर्वी २५ - ३० रुपये प्रतिकिलो दराने असणारा कांदा सध्या ५० - ६० रुपये किलो दराने विकला जात आहे. लसूण, आले यांची आवक मंदावल्याने दर वाढले आहेत. तर कांद्याची निर्यात वाढल्याने कांद्याचे दर वाढले आहेत. टोमॅटो ३० रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. पावसाच्या उघडीपमुळे पालेभाज्यांचे दर कमी झाले आहेत. मेथी, कोथिंबीर १५ - २० रुपये जुडी दराने विक्री केली जात आहे. गाजर २५ रुपये, बीट ५० रुपये, वाटाणा ८० - ९० रुपये, बीन्स ७० रुपये, राजमा ८० रुपये, वांगी २५ रुपये, गवार ७० रुपये, शेवगा ८० रुपये, दोडका ८० रुपये, फ्लॉवर २० रुपये, कोबी १० रुपये, काकडी २५ रुपये, टोमॅटो ३० रुपये, शिमला ६० रुपये, मिरची ६० रुपये, लसूण १८० - २०० रुपये, आले १०० - १५० रुपये, तोंडली ७० - ८० रुपये, बटाटा २५ - ३० रुपये किलो दराने विक्री केली जात आहे.

फळभाज्यांचे दर पुढील प्रमाणे : रविवारी बाजारात गवार ७० रुपये किलो, शेवगा ८०, टोमॅटो ३०, भेंडी ६०, फ्लॉवर २५, कोबी १५, मिरची ६०, गाजर २५, शिमला ६०, लसूण १८० - २००, आले १५०,वांगी २५, काकडी २५, कारले २५ , कांदे ५० - ६० रुपये किलो, बटाटा २५ - ३०, बिन्स ७०, पावटा ८०, लाल भोपळा ५०, घोसाळी ४०, दोडका ६०, तोंडली ७०, बीट ५०, दुधी २५, घेवडा ५० रुपये किलो दराने विक्री केली जात आहे.

पिंपरी बाजारातील पालेभाज्यांचे दर (रु.) प्रति जुडी : कोथिंबीर १५ - २० रुपये, मेथी १५ - २० रुपये, पालक १५, शेपू १५, राजगिरा १५, पुदिना १५, मुळा १५, चवळई १५, लाल माठ १५, हिरवा माठ १५, करडई १५, कांदापात १५, करडई १५, आळू पाने १० रुपये जुडी, आंबट चुका १५ रुपये.

फळभाज्यांचे : किलोचे भाव (किरकोळ रु.) : शेवगा ९० रुपये, गवार ८०, पावटा ७०, तोंडली ७०, बीट ५० , दोडका ७०, कारली ३० - ३५ , भरताची वांगी ५०, भेंडी ५०, मिरची ७०, फ्लॉवर २५, कोबी २०, वांगी ३० - ३५ , घोसाळे ५०, पडवळ ५०, दुधी भोपळा ३० - ३५ , पापडी ९०, पावटा ८०, सुरण ९०, मद्रास काकडी ३०- ३५, आरबी 80, सिमला ७० रुपये, राजमा ८०, बिन्स ८०, गाजर ३० - ३५ रुपये किलो, रताळी ७० रुपये, टोमॅटो ३० रुपये प्रतिकिलो असे दर आहेत. मोशी उपबाजारातील घाऊक दर (प्रतिकिलो रु.) : कांदा ३५, बटाटा १०, लसूण १००, आले १०० , भेंडी १५, गवार ४०, टोमॅटो १५, वाटाणा ६०, घेवडा ३५, दोडका ३०, हिरवी मिरची ३५, दुधी भोपळा १५, काकडी १५, कारली २५, गाजर २५, फ्लॉवर १५, कोबी १०, ढोबळी २०, वांगी १५, शेवगा ३५, घोसाळी ३०, लिंबू १९०, मका कणीस १०० रुपये प्रतिकिलो दर होते. मोशी उपबाजारातील दर, आवक (क्विंटल) : फळभाजी ४६५२, पालेभाजी ५५३०० (गड्डी), फळे आवक ६१६, कांदा ६०७, बटाटा १२१५, लसूण १०, आले ५५, भेंडी १६५, गवार २६, टोमॅटो ५४६, वाटाणा ३३, घेवडा ७९, दोडका २८, हिरवी मिरची १३६, दुधी भोपळा ८९, काकडी १८८, कारली ८१, डांगर ९१, गाजर ८४, फ्लॉवर ३३४, कोबी २९५, वांगी १५९, ढोबळी ९१, बीट १९, शेवगा ६६, लिंबू ३०, मका कणीस ९५, तोंडली ८, रताळी २ क्विंटल इतकी आवक झाली आहे.

## ८४व्या वर्षीही सायकलवरून रोज १०० किमी; पिंपरी-चिंचवडचे ‘सायकलपटू आप्पा’ अजूनही जोमात!

■ पिंपरी : (दै. संध्या)



वयाच्या ८४ व्या वर्षीही रोज सुमारे १०० किलोमीटर सायकल चालवत शहराचा कानाकोपरा पिंजून काढणारे अशोक बेलापूरकर (आप्पा) हे पिंपरी-चिंचवडमधील वेगळेच व्यक्तिमत्त्व. ‘आप्पाचा विषय लय हार्डयं’ हे गाणे वाजले की, डोळ्यांसमोर येतो तो सायकलवरून वाऱ्याच्या वेगाने फिरणारा आप्पांचा चेहरा. आळंदी ते भोसरी आणि पुढे तळेगाव, चाकण, हिंजवडी, पिंपरी असा त्यांचा रोजचा प्रवास. शहरात काय नवीन घडतेय, कोणते नवे प्रयोग सुरू आहेत, याची माहिती घेत ते आजही सायकलवरूनच भेटीगाठी करतात. आधुनिक गिअरची सायकल नाही, तर साधी सायकल हीच त्यांचा आजपर्यंतच्या जीवनाची साथीदार आहे.

आप्पांचा सायकल प्रवास तब्बल सात दशकांहून अधिक जुना आहे. लहानपणापासून सायकलची असलेली आवड व चालवण्याची धडपड पाहून त्यांच्या वडिलांनी शेळी आणि दोन बोकड विकून ४५ रुपयांना सायकल घेऊन दिली. ‘सायकलचा चांगला उपयोग कर,’ एवढाच संदेश वडिलांनी दिला आणि तोच आप्पांनी आयुष्यभर जपला.

वर्षानुवर्षांच्या प्रवासात अनेक सायकली आल्या-गेल्या; मात्र सुमारे ४७ वर्षे जुनी सायकलही आप्पांच्या आठवणींचा अविभाज्य भाग आहे. लाखो किलोमीटरचा प्रवास, असंख्य रस्ते आणि हजारो आठवणी या सायकलने पाहिल्या आहेत. सायकलवरून आळंदी-पंढरपूर वारीसह विविध भागांत त्यांनी प्रवास केला आहे. सायकलचे शहर’ ही ओळख कायम राहावी!“एकेकाळी आपले शहर ‘सायकलचे शहर’ म्हणून ओळखले जायचे. शहराची ही ओळख काळाच्या ओघात कमी होऊ नये, तर नव्या पिढीने पुन्हा सायकलकडे वळावे.

## देहूगावात कौटुंबिक वादातून पत्नीचा खून

■ पिंपरी (दै. संध्या)

कौटुंबिक वादातून पतीने पत्नीवर धारदार शस्त्राने वार करून तिचा खून केला. त्यानंतर पतीने स्वतःच्या अंगावरही वार करून दुसऱ्या मजल्यावरील गॅलरीतून खाली उडी मारली. देहूगाव येथील ओमकार सोसायटीमध्ये रविवारी (दि. २०) पहाटे पावणेसहाच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. शुभांगी आकाश बारस्कर (२८, रा. ओमकार हाउसिंग सोसायटी, देहूगाव, ता. हवेली, जि. पुणे) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे.

तिचा पती आकाश रामदास बारस्कर (२६, व्यवसाय आयटी कंपनी, रा. ओमकार सोसायटी, देहूगाव) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विक्रम बनसोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार रविवारी पहाटे सहाच्या सुमारास गस्तीवरील पोलिसांना देहूगाव येथील ओमकार सोसायटी परिसरात एकाला मारहाण झाल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तेव्हा घरमालक प्रकाश रामचंद्र राऊत यांच्याकडे भाड्याने राहणारा आकाश बारस्कर हा रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेला आढळला. त्याची पत्नी शुभांगी ही दुसऱ्या मजल्यावरील खोलीत गंभीर जखमी आणि बेशुद्ध अवस्थेत आढळून आली.

पोलिसांनी दोघांनाही तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर शुभांगी हिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. तर, आकाशवर उपचार सुरू आहेत. आकाश आणि शुभांगी यांचा डिसेंबर २०२३ मध्ये विवाह झाला होता. मागील चार ते पाच महिन्यांपासून दोघेही ओमकार सोसायटीत भाड्याने राहत होते. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत मागील सुमारे एक वर्षापासून दोघांमध्ये वाद सुरू असल्याचे समोर आले आहे. याच वादातून आकाशने पत्नीवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यानंतर त्याने स्वतःच्या अंगावरही वार करून बचाव करण्याच्या उद्देशाने दुसऱ्या मजल्यावरील गॅलरीतून खाली उडी मारल्याची माहिती प्राथमिक तपासात पुढे आली आहे.

## ९३ लाखांचा प्रतिबंधित गुटखा-पानमसाला जप्त

■ पिंपरी : (दै. संध्या)

नाशिककडून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या कंटेनरमधून महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला सुमारे ९३ लाख रुपये किमतीचा गुटखा आणि पानमसाला जप्त करण्यात आला आहे. चाकण उत्तर पोलिस आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने तळेगाव चौक येथे शुक्रवार (दि. १८) सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास सापळा रचून कंटेनर अडवला. या कारवाईत चालकाला अटक करण्यात आली असून गुन्ह्यात आणखी चार आरोपी निष्पन्न झाले आहेत.

प्रतिबंधित गुटख्याच्या वाहतुकीमागे आंतरराष्ट्रीय साखळी असण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तपास सुरू केला आहे. नफीस मेहबूब खान (४०, रा. फिरोजपूर, हरियाणा) असे अटक केलेल्या कंटेनर चालकाचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध चाकण उत्तर पोलिस ठाण्यात संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात आणखी चार आरोपी निष्पन्न झाले असून ते सध्या फरार आहेत. त्यांच्या शोधासाठी पोलिस पथके काम करीत आहेत. वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, चाकण उत्तर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा आणि पानमसाल्याची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. चाकण उत्तर पोलिस ठाण्याच्या तपास पथकाने अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह तळेगाव चौक परिसरात सापळा रचला. दरम्यान, शुक्रवारी सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास नाशिक-पुणे मार्गावरून नाशिककडून पुण्याच्या दिशेने येणारा टाटा कंपनीचा कंटेनर पोलिसांच्या निदर्शनास आला.

## दानवे यांचा पिंपरी चिंचवड शहरात दौरा

■ पिंपरी (दै. संध्या)

अंबादासजी दानवे यांनी आज शनिवारी पिंपरी-चिंचवड शहराचा दौरा केला. दापोडी येथील शिवसेना विभागीय कार्यालयापासून त्यांच्या दौऱ्याला सुरुवात झाली. यावेळी शहराध्यक्ष चेतन पवार, यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, युवासेना तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये एनडीपीएसचे ७३ आरोपी ‘वॉन्टेड’

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल विविध गुन्ह्यांतील तब्बल ७३ आरोपी 'वॉन्टेड' आहेत. शहरात अमली पदार्थांची विक्री आणि तस्करी रोखण्यासाठी या फरार आरोपींचा शोध महत्त्वाचा ठरत असल्याने पोलिसांनी त्यांच्याविरोधात न्यायालयीन प्रक्रिया सुरू केली आहे. स्टँडिंग वॉरंट, फरारी उद्‌घोषणा आणि आवश्यकतेनुसार मालमत्ता जप्तीच्या माध्यमातून आरोपींवर कायदेशीर दबाव वाढविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक, आयटी आणि शैक्षणिक केंद्र आहे. शहरात राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतूनही मोठ्या प्रमाणावर नागरिकांची ये-जा असते. पुणे-मुंबई आणि पुणे-नाशिकसह महत्त्वाचे मार्ग शहर परिसराला जोडलेले असल्याने अमली पदार्थांची वाहतूक आणि स्थानिक पातळीवरील वितरण रोखणे हे पोलिसांसमोरील मोठे आव्हान आहे. अमली पदार्थांच्या गुन्ह्यात प्रत्यक्ष मुद्देमालासह पकडलेली व्यक्ती ही अनेकदा तस्करीच्या साखळीतील केवळ एक कडी असते. मालाचा मूळ पुरवठादार, वाहतूक करणारे, साठवणूक करणारे आणि स्थानिक पातळीवर विक्री करणारे अशा विविध स्तरांवर नेटवर्क कार्यरत असू शकते. त्यामुळे संबंधित गुन्ह्यातील फरार आरोपी पोलिसांच्या हाती लागल्यास पुरवठ्याचा स्रोत आणि वितरणाचे पुढील धागेदोरे उलगडण्यास मदत होऊ शकते. या पार्श्वभूमीवर एनडीपीएस गुन्ह्यांतील ७३ 'पाहिजे' आरोपींविरोधात संबंधित तपासी अधिकाऱ्यांना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बीएनएसएस कलम ७५ अन्वये स्टँडिंग वॉरंट, कलम ८४ अन्वये फरारी उद्‌घोषणा आणि कलम ८५ अंतर्गत उद्‌घोषित आरोपीच्या मालमत्ता जप्तीसाठी कार्यवाही केली जाणार आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

अमली पदार्थांची उपलब्धता ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या नाही. तरुण व्यसनाच्या विळख्यात अडकल्यास त्याचे परिणाम शिक्षण, रोजगार, कुटुंब आणि सामाजिक आयुष्यावर होतात. व्यसनासाठी पैशांची गरज निर्माण झाल्यानंतर चोरी, घरफोडी किंवा अन्य गुन्ह्यांकडे वळण्याचाही धोका असतो. त्यामुळे अमली पदार्थांच्या किरकोळ विक्रीपेक्षा त्यामागील पुरवठा बंद करण्यावर पोलिसांचा भर आहे.

कारवाईबरोबरच प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शाळा, महाविद्यालये, आयटी कंपन्या आणि तरुणांची वर्दळ असलेल्या भागांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती केली जात आहे. मागील काळात पोलिसांनी शैक्षणिक संस्था आणि आयटी कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष संवाद साधला. गणेशोत्सव काळातही मंडळांच्या माध्यमातून नागरिकांना अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

फरार आरोपी पोलिसांच्या हाती लागल्यानंतर त्याचे मोबाईल संपर्क, बँक व्यवहार, सहआरोपींशी असलेले संबंध आणि मालाच्या वाहतुकीचा मार्ग तपासला जातो. आरोपी परजिल्ह्यात किंवा परराज्यात असल्यास संबंधित पोलिसांशी समन्वय साधून शोध घेतला जातो. अशा तपासातून स्थानिक विक्रेत्यापासून मूळ पुरवठादारापर्यंतचा दुवा मिळू शकतो. प्रत्यक्ष शोध घेऊनही आरोपी सापडत नसल्यास न्यायालयीन प्रक्रियेद्वारे त्यांच्यावर दबाव वाढविण्यात येत आहे.

दैनिक संध्या नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकणला देखावे पाहण्यासाठी गणेश भक्तांची तुफान गर्दी

**चाकण : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चाकण शहरात भक्ती आणि उत्साहाचे मोठे उधाण पाहायला मिळत आहे. सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी उभारलेले आकर्षक आणि देखणे देखावे पाहण्यासाठी चाकणसह परिसरातील गणेशभक्तांची मोठी गर्दी होऊ लागल्याने गणेश भक्तांनी चाकण मधील रस्ते फुलून गेले आहेत. देखावे पाहण्यासाठी मोजकेच काही दिवस शिल्लक राहिल्याने चाकणमध्ये सायंकाळ नंतर येथील मुख्य रस्ते, चौक आणि मंडळांचे मंडप भक्तांच्या गर्दीने तुडुंब भरत आहेत. दरम्यान, गौरी पूजनाची खास आरास पाहण्याकरिताही चाकण बाजारपेठेत तरुणी व महिलांची प्रचंड झुंबड पाहायला मिळाली. चाकणच्या मुख्य बाजारपेठेत महिलांची मोठी वर्दळ दिसून आली. एकमेकींना भेट वस्तू देऊन सणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी बाजारपेठेत हळदी - कुंकवाचा विशेष कार्यक्रम आणि खरेदीचा उत्साह पाहावयास मिळाला. गणरायाच्या पूजनासाठी लागणारी फुले, फळे, पूजा साहित्य, आणि मिठाई खरेदी करण्यासाठी सकाळपासूनच चाकण बाजारपेठेत ग्राहकांची तोबा गर्दी होत आहे. व्यापारी आणि विक्रेत्यांच्या चेहऱ्यावरही ग्राहकांमुळे आनंदाचे वातावरण पसरले आहे. गर्दीचा उच्चांक पाहता गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली येथील मुख्य बाजारपेठ आणि मुख्य देखाव्यांच्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतुकीमध्येही आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत. एकंदरीत देखाव्यांची भव्यता आणि गौरी पूजनाचा धार्मिक उत्साह यामुळे सध्या चाकण शहर पूर्णपणे 'गणपती बाप्पा मोरया'च्या गजरात आणि सणाच्या आनंदात न्हाऊन निघाले आहे. " देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या गणेश भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून मंडळाच्या वतीने पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र रांग करण्यात आली आहे. प्रशासनाचे सर्व नियम पाळूनच देखावे सादर केले जात आहेत, असे मंगेश कांडगे, नगरसेवक, चाकण यांनी सांगितले.

### बोपगाव येथील प्राथमिक व माध्यमिक शाळेत अथर्वशीर्ष पठण उत्साहात संपन्न

**पुरंदर : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील बोपगाव येथे श्री नवनाथ देवस्थान पंचायत समिती ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ तसेच अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ दिंडोरी प्रणित आकुर्डी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा व सदगुरू कानिफनाथ विद्यालय येथील विद्यार्थी, शिक्षक व ट्रस्ट यांच्या माध्यमातून अथर्वशीर्ष व संस्कार उपक्रम आयोजित करण्यात आला होता. श्री स्वामी समर्थ दिंडोरी प्रणित आकुर्डी केंद्र विषय तज्ञ सर्वेश बेंद्रे यांनी आजच्या कलियुगात कॉम्प्युटर, मोबाईल, पेटीएम, फोन पे, या सर्व तंत्रज्ञान विषयी माहिती सांगितली. गणपती अथर्वशीर्ष रोज मुलांनी म्हटले तर आपल्यावरील ताण, तणाव, भीती, दडपण परीक्षा विषयी काळजी सर्व दूर होतील. आपल्या आई वडील शिक्षक हेच आपले गुरु आहेत यांच्याविषयी चांगली माहिती सांगितली. नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट वतीने अध्यक्ष सुरेश फडतरे, उपाध्यक्ष दीपक फडतरे, खजिनदार सोनबा फडतरे, डेक्कन मर्चंट बँकेचे संचालक दयानंद फडतरे, सामाजिक कार्यकर्ते दीपक बबन फडतरे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष मयुर फडतरे, जि.प.शाळा बोपगाव मुख्याध्यापक शोभा कामठे व शिक्षकवृंद कानिफनाथ विद्यालय व सद्गुरु माध्यमिक विद्यालय बोपगाव मुख्याध्यापक मारुती झगडे व शिक्षक वृंद उपस्थित होते.

### गणेशोत्सवाची ७२ वर्षाची परंपरा जपणारे श्रीनाथ गोसावीबुवा तरुण मंडळ

**पुरंदर : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील श्रीनाथ गोसावीबुवा तरुण मंडळ गेली ७२ वर्षे गणेशोत्सवाची परंपरा जपत आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, खेळांच्या स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आदी विविध सामाजिक उपक्रमांद्वारे येथील गणेशोत्सव साजरा होत असल्याची माहिती श्रीनाथ गोसावीबुवा तरुण मंडळाचे अध्यक्ष नवनाथ विठ्ठलराव भिसे यांनी दिली. गणेश आरतीप्रसंगी पुरंदर पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्ताशेठ काळे, पुरंदर भाजपाचे अध्यक्ष संदीप कटके, माजी सरपंच संजय कटके, विशाल कटके, दिलीप कटके, विकास सोसायटीचे चेअरमन किरण कटके , उपसरपंच मारुती कटके , तंटामुक्ती अध्यक्ष शेखर कटके, सामाजिक कार्यकर्ते नाथाभाऊ कटके, चंद्रकांत गोफणे , हनुमंत कामठे , शिवाजी पवार , रघुनाथ ढवळे, दादासाहेब कटके, उत्तम कटके , सागर कटके, रामदास कटके, दत्तात्रय कटके, बापूसाहेब कटके, महादेव फडतरे,लक्ष्मण कटके ,भगत बापू कटके, राजेंद्र काळे , तानाजी कटके , मंगेश ढवळे,माजी सैनिक दत्तात्रेय कटके, बंडू कटके, उद्योजक संदेश पवार उपस्थित होते. सार्वजनिक गणेशोत्सवाची ही अखंड परंपरा यापुढेही निरंतर चालू ठेवणार असल्याचे श्रीनाथ गोसावीबुवा तरुण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

### उवसग्गहरं स्तोत्राच्या दशकपूर्ती सोहळ्यात ८ हजार भाविकांची मंत्रमुग्ध साथ

**पुरंदर : दैनिक संध्या**

जैन धर्मपरंपरेत परमपावन आणि संकट निवारणासाठी श्रद्धेने जपले जाणारे 'श्री उवसग्गहरं स्तोत्र'च्या सामुदायिक जापाच्या उपक्रमाने यंदा दशकपूर्तीचा टप्पा गाठला. त्यानिमित्त रविवार दि. ६ सप्टेंबर रोजी बिबवेवाडी येथील जैन स्थानकाच्या प्रांगणात भव्य आध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास सुमारे ८ हजार भाविकांनी उपस्थित राहून एकसुरात 'श्री उवसग्गहरं स्तोत्रा'चा जाप केला. सामुदायिक जापाच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

दुपारी चार वाजता सुरू झालेल्या या सोहळ्यात मोठ्या संख्येने जैन समाजबांधव तसेच भाविक सहभागी झाले होते. भव्य मंडपात भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने उपस्थित राहून सामुदायिक जापात सहभाग घेतला. एकाच सुरात हजारो भाविकांकडून स्तोत्राचा जाप होत असताना निर्माण झालेले आध्यात्मिक वातावरण उपस्थितांसाठी अत्यंत भावस्पर्शी ठरले.

या मंगल सोहळ्यास दिगंबर आचार्य पू. श्री प्रणामसागरजी म. सा., वाणीचे जादूगार पू. श्री रमणिकमुनिजी म. सा., वीरायतनच्या शिल्पकार आचार्य पू. श्री चंदनाजी म. सा. यांच्या सुशिष्या पू. श्री विभाजी म. सा. व पू. श्री संघमित्राजी म. सा., तसेच बिबवेवाडी येथील आर. एम. डी. स्थानकात चातुर्मास सुरू असलेल्या साध्वी पू. श्री जयश्रीजी म. सा. आदिठाणा यांच्यासह साधू-साध्वीगणांची उपस्थिती व आशीर्वचन लाभले.

# विद्यार्थी दशेत मोबाईलचा अती वापर टाळा तरच जीवन यशस्वी

■ **कवठे येमाई (दै. संध्या)**

विद्यार्थ्यांच्या जीवनात मोबाईल आणि सोशल मीडियाचा अतिवापर एकाग्रता नष्ट करतो. मोबाईलचा वापर टाळला किंवा मर्यादित ठेवला, तरच विद्यार्थी आपल्या ध्येयापर्यंत पोहोचून जीवनात यशस्वी होऊ शकतो, असे प्रतिपादन स्वयंसेवक अनाथ आश्रम (मंगळक पारगाव) चे संस्थापक सचिन भोजने यांनी केले.

कवठे येमाई येथील 'नवज्योत कला क्रीडा सांस्कृतिक मंडळा' यांच्या वतीने गणेशोत्सव २०२६ च्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, कवठे येथील विद्यार्थ्यांना 'सोशल मीडिया व मोबाईलचे दुष्परिणाम' या विषयावर सचिन भोजने यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, शिक्षक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सचिन भोजने यांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर होणारे परिणाम स्पष्ट केले. मोबाईलमुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासातील वेळ वाया जातो तसेच मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य व मर्यादित वापर करून शिक्षण, खेळ आणि सामाजिक उपक्रमांकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. मार्गदर्शनातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'गनिमी कावा' युद्धतंत्रावर प्रकाश टाकला. तसेच हिंदवी स्वराज्याचे गुप्तहेर प्रमुख बहिर्जी नाईक यांच्या शौर्याबद्दल व स्वराज्यासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी चा आलेख विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मोबाईलच्या दुष्परिणामांची जाणीव करून देत अभ्यास, ध्येय आणि संस्कार यांना प्राधान्य देण्याचा संदेश देण्यात आला.



## डीजे संस्कृतीला फाटा देत शौर्य ग्रुपची 'आनंद गणेश यात्रा'!



■ **पुरंदर (दै. संध्या)**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजे संस्कृतीला फाटा देत शौर्य ग्रुप, जेजुरी व शिव मल्हार मित्र मंडळ, जेजुरी यांच्या वतीने महिला, बालगोपाळ तसेच सर्व गणेशभक्तांसाठी विशेष 'आनंद गणेश यात्रा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यानगर, दवणे मळा रोड परिसरात गणेशभक्तांसाठी मोफत पाळण्यांची व्यवस्था करण्यात आल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, या ठिकाणी जत्रेचे स्वरूप आले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात लहान मुले आपल्या कुटुंबीयांसह मोठ्या उत्साहाने या मोफत पाळण्यांचा आनंद घेत आहेत. पाळण्यांमध्ये रमलेल्या बालगोपाळांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि त्यांच्यासोबत आलेल्या कुटुंबीयांचा उत्साह यामुळे परिसरात आनंदमय वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांकडूनही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

सामान्य नागरिक आणि गणेशभक्तांना उत्सवाचा आनंद आनंददायी व कौटुंबिक वातावरणात घेता यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

मनोरंजनासोबतच सामाजिक बांधिलकी जपत गणेशोत्सव साजरा करण्याचा शौर्य ग्रुपचा हा प्रयत्न असल्याने परिसरात या उपक्रमाची चर्चा होत आहे.

या उपक्रमाचे आयोजन शौर्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष गणेश दुर्योधन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. उत्सव प्रमुख वैभव कोरपड, सागर खुंटे यांच्यासह शौर्य ग्रुप व शिव मल्हार मित्र मंडळाचे अनेक कार्यकर्ते आयोजन आणि नियोजनासाठी परिश्रम घेत आहेत. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या मोफत पाळण्यांचा आणि 'आनंद गणेश यात्रा' उपक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## चाकणला रक्तदान शिबिरात तरुणांबरोबर महिलांनीही केले रक्तदान

■ **चाकण (दै. संध्या)**

रक्ताचा तुटवडा टाळण्यासाठी व अपघात ग्रस्तांचे प्राण वाचवण्याकरता श्रीरामनगर येथे रोटरी क्लब ऑफ चाकण आणि श्रीराम नगर गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तरुणांबरोबर महिलांनीही उस्फूर्तपणे रक्तदान केले.

जहांगीर हॉस्पिटल, पुणे यांच्या सहकार्याने चाकण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला तरुण व महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. रक्तदान करणाऱ्या दीडशे रक्तदात्यांचा यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक साहेबराव कड यांनी यावेळी सांगितले की," गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन त्यांचे प्राण वाचले जावेत. तसेच रक्ताचा तुटवडा भासू नये याकरता सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हे जीवनदान असून, नागरिकांनी अशा सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घ्यावा, असा संदेश या शिबिरातून देण्यात आला."

यावेळी चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले, सचिव डॉ.भरत राऊत, चाकण रक्तपेढीचे संचालक चंद्रकांत हिवरकर, चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक तथा गटनेते साहेबराव कड आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञानेश्वर माऊली मुंगसे यांनी सूत्रसंचालन केले. नितीन देशपांडे यांनी आभार मानले.

## शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई!



■ **शिरूर (दै. संध्या)**

शिरूर शहरातील लाटेआळी, आंबेडकरनगर परिसरात जुन्या वादातून तरुणावर गोळीबार करून हत्या केल्याच्या गंभीर गुन्ह्यातील तीन आरोपींना शिरूर पोलिसांच्या डी.बी. पथकाने अवघ्या ४८ तासांत अटक केली आहे. पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांचा वचक निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामगिरी झाली आहे.

दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास शिरूर शहरातील लाटेआळी, आंबेडकरनगर येथे तौफिक अन्सारी यांच्या घरासमोर रस्त्यावर पैशांच्या वादातून आरोपींनी तरुणाची हत्या केली होती.

या घटनेत हरिष दादाभाऊ गंगावणे (वय ३४, रा. कामाठीपुरा, शिरूर) यांच्या कानाच्या मागील बाजूस पिस्तुलातून गोळी झाडून त्यांना गंभीर जखमी करण्यात आले.

त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन शिरूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांनी तपास पथकाचे पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व पोलिस अंमलदार यांना आरोपींचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले.

## पीएमपीएमएल बस शिरुर पर्यंत आणावी : अन्यथा आंदोलन करणार

■ **शिरूर (दै. संध्या)**

वाघोलीवरुन कारेगावपर्यंत येणारीच पीएमपीएमएल बस पुढे शिरूर पर्यंत आणावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा शिरूर शहर भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रिया लोकेश बिरादार यांनी सहव्यवस्थापकीय संचालक ॲलीस पोरे यांच्यामार्फत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.



यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,सध्या शाळा व महाविद्यालये सुरू झालेले आहे.तसेच शिरूर व परिसरातील पाषाणमळा,बोऱ्हाडे मळा,घावटे मळा,सरदवाडी,फलके मळा,करडे,आंबळे,कारेगाव,कोंढापुरी व कासारी फाटा या परिसरातील विद्यार्थी तसेच कामगार वर्ग व नागरिक मोठ्या प्रमाणात शिरूरला आणि पुणेला रोज ये - जा करतात परंतु या मार्गावरील पुणे - नगर जाणाऱ्या एसटी बस रांजणगाव व शिक्रापूर वगळता यामधील मार्गावरील इतर विविध ठिकाणी थांबत नसल्याने विद्यार्थी,कामगार वर्ग,महिला, जेष्ठ व उपचारासाठी रुग्णांची मोठी गैरसोय होत असून सध्या सुरू असलेल्या कारेगाव - शिरूर व शिरूर - कारेगाव या फक्त सकाळ संध्याकाळच्या सत्रात बसच्या फेऱ्या सुरू असून त्या ऐवजी वाघोलीवरुन कारेगावपर्यंत ता.शिरुर येत असलेली पीएमपीएमएलच पुढे शिरुरपर्यंत दिवसभर सुरू करावी त्यामुळे अनेकांची होणारी गैरसोय टळेल त्याचबरोबर पीएमपीएमएलला या सेवेतून चांगले उत्पन्नही मिळेल.

तरी कारेगावला येत असलेली पीएमपीएमएल बसच चार्जिंग पुरत नसेल तर त्याऐवजी डिझेल किंवा सीएनजी बस लवकरात लवकर पुढे शिरूर पर्यंत सुरू करावी अन्यथा शिरूर शहर भाजपा महिला आघाडीच्यावतीने आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

# चक्रेश्वर पतसंस्थेच्या वतीने सभासदांना आठ टक्के लाभांश जाहीर

■ **चाकण (दै. संध्या)**

चाकण येथील चक्रेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना आठ टक्के लाभांश जाहीर करत वर्धापन दिनाचे औचित्य साधून सभासदांना अनोख्या भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले.

चाकण येथे हेमंत शिवाजी बिरदवडे यांच्या अध्यक्षतेखाली चक्रेश्वर पतसंस्थेच्या वतीने वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी संस्थेचे संस्थापक - अध्यक्ष ज्ञानेश्वर केळकर यांनी सभासदांना आठ टक्के लाभांश जाहीर केला. तसेच संस्थेच्या तिसाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सर्व सभासदांना भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक ज्ञानेश्वर केळकर, संस्थेचे अध्यक्ष संदीप कानपिळे, उपाध्यक्ष अनिल गोसावी, सचिव जाहिरा मुंढे, संचालक अक्षय केळकर, राजाराम जाधव, सविता शेवकरी, लता घुमटकर, योगेश लेंडघर, अनिल गोसावी, प्रमोद साळुंके, सुरेश बिरदवडे, सर्जेराव गोरे, रामदास बिरदवडे, प्रियंका जाधव, तसेच चाकण ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्तात्रय बिरदवडे, माजी सदस्या नीता केळकर, माजी नगरसेवक विकास धाडगे, बाळासाहेब लेंडघर, राजेंद्र घुमटकर, पांडुरंग गोरे, गणेश शेवकरी, ऋषिकेश धाडगे, कैलास लेंडघर, सत्यवान गोरे, शिवाजी धाडगे, रघुनाथ बिरदवडे, अर्जुन गोरे, उमेश गोरे, शरद लेंडघर, ज्ञानेश्वर



दरवडे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, सेवक वृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक - संचालक ज्ञानेश्वर केळकर यांनी सांगितले की," चक्रेश्वर पतसंस्थेच्या वतीने सभासदांना आठ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या तिसाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या वतीने दिनदर्शिका प्रकाशन, हळदी कुंकू कार्यक्रम, वाहन तारण कर्ज वितरण, सोने तारण कर्ज, गृह तारण कर्ज, वाहन तारण कर्ज देण्यात आले आहे."

यावेळी मागील वर्षीचा सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक व लेखापरीक्षण अहवालावर विचार विनिमय करून स्वीकृत करण्यात आला. नफा वाटणीस मान्यता देऊन आठ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. अंदाजपत्रक व ज्यादा खर्चास मान्यता देण्यात आली. संस्थेच्या सचिव जाहिरा मुंढे यांनी अहवाल वाचन केले.

दैनिक संध्या
मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे



## विद्युत सुरक्षा, वीज बचत, हरित ऊर्जेसाठी सामाजिक बांधिलकीतून काम करा : पवार

**पुणे : दैनिक संध्या**

महावितरणच्या दैनंदिन कामकाजासोबतच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाजाप्रती असलेली बांधिलकी जपली पाहिजे. लहान मुलांमध्ये विद्युत सुरक्षा, वीज बचत आणि हरित ऊर्जेबाबत जनजागृती केल्यास त्याचा दूरगामी सकारात्मक परिणाम होईल. त्यामुळे आपल्या कामाच्या माध्यमातून समाजहिताचे उपक्रम राबविण्यास प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन महावितरणचे संचालक (मासं) श्री. राजेंद्र पवार यांनी केले. गणेशोत्सवानिमित्त पेशवेपार्क उपविभागातील दत्तवाडी शाखेत आजी-माजी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने आयोजित 'गणेशोत्सवानिमित्त स्नेहसंमेलन व विशेष गौरव पुरस्कार सोहळा-२०२६' शनिवारी (दि. १९) उत्साहात पार पडला. यावेळी कर्मचारीहित, सुरक्षितता आणि सक्षमीकरणासाठीच्या योगदानाबद्दल श्री. राजेंद्र पवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. महावितरणच्या विकासात प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याचा सहभाग महत्त्वाचा असून, आपल्या कार्यातून संस्थेच्या प्रगतीला हातभार लावावा, असेही पवार यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांना कामासाठी आवश्यक सुविधा मिळाव्यात यासाठी स्थापत्य विभागाशी संबंधित आवश्यक कामे मार्गी लावण्यासाठी मानव संसाधन विभाग कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वीज सुरक्षा, वीज बचत व हरित ऊर्जेबाबत अंध विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केल्याबद्दल डहाणूकर शाखेचे सहा. अभियंता अतुल धांडोरे यांचा, तर भोसरी विभागात एकाच वेळी ५,३४५ विद्यार्थ्यांसाठी रंगभरण स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल इंद्रायणीनगर शाखेचे सहा. अभियंता विशाल नाईकनवरे यांचा श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. यावेळी 'कर्मचारी आरोग्य सेवा गौरव' पुरस्कार मेडी असिस्टचे अमित गायकवाड यांना, तर 'स्वच्छता व सुशोभीकरणातील उत्कृष्टता गौरव' पुरस्कार स्थापत्य विभागाला प्रदान करण्यात आला. दरम्यान, जनमित्र महादेव चांगिरे व अय्युब देशमुख यांनी विद्युत धक्का अथवा संभाव्य धोका निर्माण झाल्यास ध्वनीच्या माध्यमातून इशारा देणारी अभिनव यंत्रणा विकसित केली आहे. या यंत्रणेचे प्रात्यक्षिक कार्यक्रमात सादर करण्यात आले. या नवकल्पनेचे कौतुक करून आवश्यक तांत्रिक सुधारणांसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन श्री. राजेंद्र पवार यांनी दिले. कार्यक्रमास प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, अधीक्षक अभियंता सुरेश सवाईराम यांच्यासह महावितरणचे अधिकारी, कर्मचारी तसेच आजी-माजी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दिव्यांग सैनिकांकरिता पोलीस आणि हिंदू - मुस्लिम बांधवांतर्फे सद्भावना रॅली

**पुणे : दैनिक संध्या**

देशाच्या सीमेवर लढताना अपंगत्व आलेल्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करीत हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत दिव्यांग सैनिकांसाठी पोलिसांसोबत सद्भावना रॅली काढली. भारत माता की जय... वंदे मातरम अशा देशभक्तीच्या घोषणांनी शहराच्या पूर्व भागातील चौक दुमदुमून गेले. यामाध्यमातून राष्ट्रभक्तीचा आणि ऐक्याचा संदेश देण्यात आला. खडक पोलीस स्टेशन आणि शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले पेठ, मोमीनपुरा परिसरात सद्भावना रॅली आयोजित करण्यात आली होती. यावेळी निवृत्त लेफ्टनंट अमरजित सिंग, क्वीन्स मेरी टेक्निकल इन्स्टिटयूटचे उपप्राचार्य शशिकांत पाटील, खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय पिंगळे, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक शर्मिला सुतार, गंज पेठ पोलीस चौकीच्या अनिता तोंडे, नगरसेवक अजय खेडेकर, गणेश कल्याणकर, राजेंद्र काकडे, नामदेव माळवदे, पीएसआय असगर सैय्यद, हवालदार नामदेव गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, उदय जगताप, कुमार रेणुसे, मुन्नाभाई शेख, अन्सर पिंजारी, दर्शन किराड, विष्णू ठाकूर, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते, मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ महाडिक, निलेश रसाळ, मंदार रांजेकर, अमर लांडे, सचिन ससाने, नमन कांबळे, कुणाल जाधव, अमय थोपटे,अभिषेक पायगुडे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. महिलांनी केलेले औक्षण, फुलांची उधळण आणि सैनिकांच्या डोळ्यांत तरळलेले आनंदाश्रू... असे भावनिक आणि उत्साही वातावरण गणेशोत्सवात पाहायला मिळाले. हिंदू बांधवांसह मुस्लिम बांधवांनी ठिकठिकाणी फुलांची उधळण करीत सैनिकांचे स्वागत केले.

## "मीमांसा" मुळे व्यावसायिक जगाचा प्रत्यक्ष अनुभव - डॉ. कीर्ती धारवाडकर

**पिंपरी, : दैनिक संध्या**

व्यवस्थापन शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमासह प्रत्यक्ष कंपनी आस्थापनांमध्ये चालणाऱ्या कामाचा अनुभव मिळणे आवश्यक आहे. या व्यावसायिक जगातील गुंतागुंत आणि अनिश्चिततेचा प्रत्यक्ष अनुभव आणि शिक्षण घेण्याची संधी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेने राष्ट्रीय पातळीवर नावलौकिक असणाऱ्या "मीमांसा" या व्यासपीठाद्वारे उपलब्ध करून दिली आहे. या अंतर्गत ऑनलाईन व ऑफलाइन पद्धतीने ही राष्ट्रीय स्पर्धा आयोजित केली आहे. यामुळे व्यवस्थापन व्यावसायिकांमध्ये विश्लेषणात्मक आणि धोरणात्मक विचार करण्याची क्षमता विकसित होईल. "मिमांसा २०२६" चे उद्दिष्ट व्यवस्थापन, शिक्षण आणि वास्तविक व्यावसायिक आव्हाने यांच्यात एक अर्थपूर्ण दुवा निर्माण करणे, विद्यार्थ्यांना पारंपरिक उपायांच्या पलीकडे विचार करण्यास प्रोत्साहित करणे, आजच्या गतिमान व्यावसायिक वातावरणातील अनिश्चिततेला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास विकसित करणे हे आहे असे एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी सांगितले. एसबीपीआयएम येथे राष्ट्रीय बिझनेस केस चॅलेंज "मीमांसा २०२६" ची प्रथम ऑनलाइन फेरी पूर्ण झाली. या स्पर्धेची ऑफलाईन अंतिम फेरी ३० सप्टेंबर रोजी एसबीपीआयएम कॅम्पस मध्ये होणार आहे.

# पथनाट्यातून मूर्तीदान व संकलन जनजागृतीचा दिला संदेश

**■ पिंपरी (दै. संध्या)**



पिंपळे गुरव येथील दिलासा संस्था आणि मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थांच्या वतीने पिंपळे गुरव येथील नदी घाटावर गणपती मूर्तीदान करा!असा संदेश पथनाट्यातून देऊन गणेशोत्सवाच्या पाचव्या व सातव्या दिवशी जनजागृती करण्यात आली.

दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक,मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थेचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड, प्रकाश घोरपडे, बालकलाकार काव्या घोरपडे, क्रांती घोरपडे यांनी पथनाट्यात सहभाग घेतला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पालिका क्षेत्रात नदी घाटावर पाण्याचे हौद तयार केले आहेत. त्याच ठिकाणी गणेश विसर्जन सर्वांनी करावे हा संदेश पथनाट्याच्या माध्यमातून देण्यात आला.

यावेळी अण्णा जोगदंड म्हणाले- "श्री चे विसर्जन पाच, सात,दहा आणि अनंत चतुर्दशी या दिवशी मोठ्या प्रमाणात होते. गणेश मूर्तीदान केल्याने अथवा हौदात विसर्जन केल्याने नदी प्रदूषण निश्चित कमी होईल. काळानुरूप माणसाने बदलले पाहिजे.! निर्माल्य नदीत न टाकता महानगरपालिकेने ठेवलेल्या निर्माल्य कुंडीत टाकावे.! याबाबत जनतेचे प्रबोधन व्हावे म्हणून पथनाट्य घेण्यात आले आहे. यात गणपती मूर्तीचा पुनर्वापर व्हावा जेणेकरून पर्यावरणालाही हानी पोहोचणार नाही आणि प्रदूषण ही वाढणार नाही तीन वर्षापासून दोन्ही संस्थाचे कार्यकर्ते गणेशमूर्ती संकलनाचे पथनाट्यातून प्रबोधनाचे काम पिं. चि.पालिकेसोबत करीत आहेत." दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक म्हणाले "आपण सर्वांनी ज्ञान, विज्ञान, अध्यात्म याची सांगड घालून काम केले पाहिजे. आपण सारे शहरवासी नदीचे पाणी वापरतो, पितो. त्यामुळे नदी निर्मळ अन् स्वच्छ ठेवणे प्रत्येकाचे काम आहे. नदीत कोणीच निर्माल्य टाकू नये.

पिं.चिं. महानगरपालिके तर्फे तसेच शहरातील अनेक संस्थांच्या वतीने मूर्ती दान हा उपक्रम राबविला जात आहे. त्याचे महत्व विषद करण्यासाठी साध्या सोप्या भाषेत पथनाट्यातून जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे." आतापर्यंत पिंपळेगुरव च्या घाटावर एकूण1500 मूर्तीचे संकलन करण्यात आले, यामध्ये शाडूच्या 400 तर पीओपीच्या 1100 मूर्तीचे संकलन करण्यात आले यामध्ये पालिका आरोग्य विभाग, दिलासा संस्था,मानवी हक्क संरक्षण आणि जागृती त्याचबरोबर बेसिक टीम यांनीही मूर्ती संकलनामध्ये सहभाग नोंदवला,उपस्थित नागरिकांना पर्यावरणाची शपथ दिली. यावेळी महानगरपालिकेचे ड प्रभागाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे म्हणाले या दोन्ही संस्थांचे सामाजिक काम खूप चांगले आहे. नेहमी महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या उपक्रमात या दोन्ही संस्था सहभागी होत असतात यापुढेही या संस्थांना आम्ही पालिकेच्या विविध उपक्रमात सामावून घेऊ".यावेळी ड प्रभागाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी राजु साबळे ,मानवी हक्क संरक्षण जागृतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड,गुणवंत कामगार प्रकाश घोरपडे, मुख्य आरोग्य निरीक्षक शंकर घाटे,आरोग्य निरीक्षक रश्मी तुंडलवार,बेसिक टिमचे झोनल प्रमुख सुखदेव लोखंडे,सागर पाटील,शिवाजी निम्हण, वार्ड इन्चार्ज विजय पेंडे,दीपक चौरे,काव्या घोरपडे, क्रांती घोरपडे उपस्थित होते. श्री गणेशाची विधिवत पूजा अन् आरती करून मुर्तिदान करण्यात आले.

## ३८ व्या पुणे फेस्टिव्हल मध्ये डर्ट ट्रॅक स्पर्धेत तरुणाईचा जोश



**■ पिंपरी (दै. संध्या)**

पुण्याच्या गोळीबार मैदानात ३८ व्या पुणे फेस्टिव्हल अंतर्गत डर्ट ट्रॅक स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. यामध्ये विविध गटांमध्ये २२५ हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये पुण्या बरोबरच कोल्हापूर, नाशिक, सातारा, अहिल्यानगर, गडहिंग्लज येथिल स्पर्धकांनी देखील भाग घेतला होता. त्यात नोविस क्लास, मॉडिफाइड बाइक्स १२५ cc, २५०cc, ३५०cc महिला गट व स्कूटर गट हे गट होते. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल आणि मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड यांनी विविध स्पर्धक गटाना फ्लैग ऑफ करून या स्पर्धेस प्रारंभ केला. याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक प्रमुख डॉ. सतीश देसाई, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे उपाध्यक्ष मनोज भोरे उपस्थित होते.

फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (एफएमएससीआय) ची मान्यता या स्पर्धेस लाभली आहे. 'एक्स्ट्रीम रेसिंग व मोटार स्पोर्ट्सच्या' संस्थापक शीतल राठोड या स्पर्धेच्या समन्वयक आहेत. याप्रसंगी Rida sayyad, Zayden Chindhy व Evan Chindhy या पुण्याच्या १० वर्षांच्या मुलांनी टूव्हीलर गाड्यांचे डेमोस्ट्रेशन दाखवून सर्वांना चकित केले. पुणे फेस्टिव्हलचे क्रीडा समन्वयक प्रसन्न गोखले आहेत.

## गणेशोत्सवातील १२ स्तंभ सांभाळणाऱ्या सेवाभावी व्यक्तींचा सन्मान



**■ पुणे (दै. संध्या)**

गणेशोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध स्तरांवर योगदान देणाऱ्या सेवाभावी व्यक्तींचा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवार पेठेत सन्मान करण्यात आला. गणेशोत्सवातील १२ स्तंभ सांभाळणाऱ्या १२ सेवाभावी व्यक्तींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य सारंग आनंद सराफ यांच्या शुक्रवार पेठेतील निवासस्थानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गणेशोत्सवातील विविध घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्वच्छता कर्मचारी, ढोल-ताशा, मंडप, रांगोळी, मूर्ती रंगकाम, हार-फुले विक्रेते, ऐतिहासिक बत्तीवाले, लोककलाकार, कला दिग्दर्शक, बँड, गणेशोत्सव अभ्यासक, मोदक विक्रेते, छायाचित्रकार, आकाशवाणी निवेदक आणि पत्रकारांचा यावेळी गौरव करण्यात आला.

स्वच्छता कर्मचारी असूनही वकील आणि सर्पमित्र म्हणून कार्य करणारे आनंद अडसूळ, ढोल-ताशा महासंघाचे पराग ठाकूर, मंडप व्यावसायिक सोमनाथ सूर्यवंशी, रांगोळी कलाकार परशुराम वाणी, दगडूशेठ गणपतीच्या प्रिंटिंग व मूर्ती रंगकामाशी संबंधित मुकेरकर, हार-फुले विक्रेते चौधरी, ऐतिहासिक बत्तीवाले वारे बंधू, लोककलाकार शाहीर हेमंत मावळे, कला दिग्दर्शक विजय महामुलकर व वृंदा साठे, शंभर वर्षांहून अधिक काळ बँड क्षेत्रात कार्यरत सोलापूरकर, गणेशोत्सव अभ्यासक स्वप्नील नहार, दररोज ५० हजार मोदक तयार करणारे किशोर सरपोतदार, ज्येष्ठ छायाचित्रकार पत्के, आकाशवाणी निवेदक सुहास धारणे, पत्रकार सुनील जगताप आणि आदर्श गणेशोत्सव मंडळाचे उदय जगताप यांचा सन्मान करण्यात आला.

सत्कारार्थींना फेटा, महावस्त्र आणि गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. गणेशोत्सवाच्या आयोजनापासून ते त्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक बाजू जपण्यापर्यंत विविध घटकांचे योगदान अधोरेखित करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

अमित ठाकरे म्हणाले, पुण्याच्या गणेशोत्सवाची कीर्ती सर्वदूर पसरली आहे. गणेशोत्सवात समाजाच्या सर्व घटकातील नागरिक सहभागी होतात. त्यामुळे हा उत्सव अधिक उत्तम रीतीने पार पडतो. त्यामुळे उत्सवात सेवा देणाऱ्या या सर्व स्तंभातील सेवाव्रतींचा सन्मान करणारा उपक्रम अतिशय स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले.

# 'दगडूशेठ'च्या वतीने गणेशोत्सवात ६ हजार भाविकांना आरोग्यसेवा

**■ पुणे(दै. संध्या)**

गर्दीमध्ये श्वास घेण्याकरिता झालेला त्रास, चक्कर येणे, रक्तदाबाच्या समस्या तसेच उत्सवकाळात आलेल्या आपत्कालीन आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करीत 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टतर्फे तब्बल ६ हजार भाविकांना आरोग्यसेवा देण्यात आली. मोफत आयसीयू सह ३ ठिकाणी केंद्र, मोफत रुग्णवाहिका सेवा देखील मंदिर परिसर आणि उत्सवाच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.





श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षी गणेशोत्सवात वृंदावन मधील प्रेम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. बाप्पाचे दर्शन घेण्याकरिता दररोज लाखो भाविक येत आहेत. त्यांच्या आरोग्याच्या समस्यांचे निराकरण जय गणेश आरोग्यसेवा अभियानांतर्गत जय गणेश प्रांगणासह मंदिर परिसरात ३ ठिकाणी केले जात आहे. उत्सवकाळात ५५ वैद्यकीय तज्ज्ञाची टीम २४ तास कार्यरत आहे. आजपर्यंत प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रात ५ हजार ९०० पेक्षा अधिक भाविक आणि आयसीयू मध्ये ९१ पेक्षा अधिक भाविकांवर उपचार करण्यात आले आहे. उपक्रमाचे नियोजन ट्रस्टचे सर्व विश्वस्त, सुवर्णयुग तरुण मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले असून ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी हे व्यवस्थापन पहात आहेत, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली. सिटी पोस्ट, दगडूशेठ गणपती मंदिर व मांगल्य मंगल कार्यालयजवळ सुसज्ज अशी २४ तास मोफत वैद्यकीय मदत केंद्र आहेत. याशिवाय भारती हॉस्पिटल रिसर्च सेंटर धनकवडी, सूर्या सह्याद्री हॉस्पिटल, जहांगिर हॉस्पिटल, रुबी हॉल क्लिनिक, डॉ.डी.वाय. पाटील हॉस्पिटल पिंपरी, संचेती हॉस्पिटल, अपोलो हॉस्पिटल शंकरशेठ रस्ता स्वारगेट येथे मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध होत आहे.

गणपती मंदिराजवळ महाराष्ट्र राज्य उपसंचालक आरोग्य सेवा पुणे तर्फे २४ तास मोफत व्हेंटिलेटर/ आयसीयू १० बेडची सुविधा देण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने १०८ क्रमांकाच्या ५ रुग्णवाहिका आणि ट्रस्टच्या ४ रुग्णवाहिका उत्सवकाळात पुणे शहर, पिंपरी-चिंचवड परिसरात विनामूल्य स्वरुपात कार्यरत आहेत. वैद्यकीय मदत केंद्रावर तसेच रुग्णवाहिकांच्या येथे मोफत औषधे देण्यात येत असून आरोग्य विषयक सर्वतोपरी मदत भाविकांना देण्याची सुविधा ट्रस्टने उपलब्ध करुन दिली आहे.

# श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांच्या पतसंस्थेची २६वी वार्षिक सभा संपन्न

■ सासवड (दै. संध्या)




सासवड (ता. पुरंदर) येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसरक मंडळ सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, विशेष मार्गदर्शक सनदी अधिकारी डॉ राजेंद्रबापू जगताप, सचिव व माजी आमदार संजय जगताप, संस्थापक सचिव व विश्वस्त सी ए प्रा. डॉ. एम.एस. जाधव, विश्वस्त यशवंत बोत्रे, प्रकाश पवार, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, रविंद्रपंत जगताप, कानिफनाथ आमराळे यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी बोलताना सनदी अधिकारी डॉ राजेंद्रबापू जगताप यांनी पतसंस्थेच्या कामाचे कौतुक केले, संस्थापक स्व. चंदुकाका जगताप यांच्या विचारातून चालणारी ही पतसंस्था राज्यातील सेवक संस्थांमध्ये नेहमीच आर्थिक शिस्त व कामकाजात आदर्श राहिली असून यापुढेही अशाच प्रकारे कार्यरत राहिल असा आशावाद व्यक्त केला. माजी आमदार संजय जगताप यांनी, शिक्षकांनी आत्मीयतेने आदर्श शाळा, सक्षम विद्यार्थी घडवून संस्थेला यशाच्या उंचीवर नेण्याचे आवाहन केले. तर विश्वस्त प्रा. डॉ. एम. एस. जाधव यांनी संस्थेच्या वाढीसाठी तसेच शिक्षकांना शैक्षणिक कामकाजासाठी सुचना केल्या. सभेच्या सुरूवातीला संस्थापक शिक्षणमहर्षी स्व. चंदुकाका जगताप यांच्या प्रतिमेचेपूजन, दिपप्रज्वलन करण्यात आले. पतसंस्थेचे मानद सचिव हनुमंत पवार यांनी प्रास्ताविक, अहवाल वाचन केले. अध्यक्ष नंदकुमार सागर यांनी, ३१ मार्च २०२६ अखेर भागभांडवल तीन कोटी ५३ लाख, ठेवी दोन कोटी २९ लाख, कर्जवाटप सहा कोटी ५१ लाख असून सभासद संख्या २४७, सात कोटी २९ लाखांचा राखीव फंड, अधिकृत भागभांडवल १० कोटी, १४ कोटींचा व्यवसाय ऑडीट वर्ग 'अ' असून इतर बँकांतील गुंतवणूक ४१ लाख २७ हजार रुपये असून ३१ लाख २६ हजार रुपयांचा नफा झाल्याचे सांगितले.

याप्रसंगी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा तसेच सभासदांच्या गुणवंत पाल्यांचे सत्कार करण्यात आले.

उपाध्यक्ष पांडुरंग जाधव, संचालक मोहन निगडे, सतीश पिसाळ, विठ्ठल कदम, प्रिया गायकवाड, पांडुरंग दुर्गाडे, रमेश बोरावके, शहाजी जाधव, राजेंद्र जाधव, विद्या कारंडे, जीवन कड, नितीन काकडे यांसह सल्लागार उत्तम निगडे, नंदकुमार बारवकर, विजय काकडे, शिवाजी कोलते, हरीभाऊ टापरे, लक्ष्मण गोळे, मारूती झगडे, गायत्री बेलसरे, विजयकुमार हाके, विलास गंगनमले, राजश्री पवार, शांताराम राणे, सुजाता पैठणकर, रेणुकासिंग मर्चंट, व्यवस्थापिका श्रद्धा जगताप यांसह सर्व सभासद उपस्थित होते. रामदास जगताप यांनी सुत्रसंचलन केले तर सतिश पिसाळ यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त प्रशासनाकडून अभिवादन

बारामती: दैनिक संध्या

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी उपविभागीय कार्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसिलदार प्रतिभा शिंदे यांच्यासह उपविभागीय कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. तहसिलदार स्वप्नील रावडे यांनी केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तहसिल कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### पुणे जिल्हा काँग्रेस (दक्षिण) च्या अध्यक्षपदी डॉ.विजयकुमार रामचंद्र भिसे यांची निवड



बारामती: दैनिक संध्या

पुणे जिल्हा काँग्रेस (दक्षिण) च्या (अनुसूचित जाती) अध्यक्षपदी डॉ.विजयकुमार रामचंद्र भिसे यांची राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्रपाल गौतम यांनी प्रदेशाध्यक्ष डॉ.अनिरुद्ध वनकर यांचे शिफारशीनुसार १८ सप्टेंबर २०२६ रोजी निवड करण्यात आली. यापूर्वी डॉ.विजय भिसे यांनी बारामती शहर काँग्रेस अध्यक्ष पदी,जिल्हा सरचिटणीस पदी,पर्यावरण विभागाच्या प्रदेश सरचिटणीस पदी काम केलेले आहे.गेली २७ वर्ष श्रीमती सोनियाजी राजीवजी गांधी फिरता मोफत दवाखाना वारकऱ्यांसाठी देहू ते पंढरपूर पालखी मार्गावर वैद्यकीय सेवा देत आहेत.तसेच बारामतीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे अशासकीय सदस्य पदी काम केले असल्यामुळे त्यांची निवड करण्यात आली.

### विविध खेळांसह रेफ्रिजरेटर, टीव्ही, गिझर व फिल्टर आकर्षक बक्षिसांचे वाटप



कवठे येमाई: दैनिक संध्या

श्री गुरुदेव दत्त फ्रेंडशिप ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ निमित्त आयोजित करण्यात आलेला 'होम मिनिस्टर' कार्यक्रम काल रविवारी सायंकाळी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमात सुमारे २०० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.महिलांसाठी 'नमस्कार राम राम' नागिन डान्स, टिकली चिटकवणे, दोरा ओढणे, केसात स्ट्रॉ अडकवणे यांसह विविध मनोरंजक खेळ व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाची रंगत वाढवली. येथील हनुमान मंदिरानजीक असलेल्या मंडळाच्या भव्य मंडपात सायंकाळी ८ वाजता 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' कार्यक्रम सुरु करण्यात आला. हा कार्यक्रम श्री. अविनाश पोळके (युवा नेते, कवठे येमाई) यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आला होता. तसेच स्व. यशवंत कारभारी पोळके यांच्या स्मरणार्थ कु. अजित दिलीपराव पोळके (युवा उद्योजक) यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी विविध मनोरंजक खेळ व स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊन विजेत्या महिलांना पैठणीसह आकर्षक बक्षिसे देण्यात आली.परिसरातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेतील विजेत्यांना मंडळाच्या वतीने आकर्षक बक्षिसे देण्यात आली. प्रथम क्रमांकाचे रेफ्रिजरेटरचे बक्षीस रोहिलेवाडी येथील माया पवार, द्वितीय क्रमांकाचे टीव्हीचे बक्षीस अश्विनी घुले, तृतीय क्रमांकाचे गिझरचे बक्षीस राणी सांगडे, तर चतुर्थ क्रमांकाचे फिल्टरचे बक्षीस सुजाता पोकळे यांनी पटकावले.

### पंचतारांकित भोजनास झुरळाची हजेरी

पुणे : दैनिक संध्या

देशाच्या शिक्षणक्षेत्रातील अनागोंदी चव्हाट्यावर आणणाऱ्या झुरळाने आता पंचतारांकित हॉटेलातील अस्वच्छतेचा मुद्दा चर्चेत आणला आहे. याला निमित्त ठरले फोर्टिस रुग्णालयातील प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ अशोक सेठ... एका हॉटेलमध्ये सायंभोजनासाठी गेलेल्या सेठ यांना त्यांच्या जेवणाच्या थाळी जवळ झुरळ फिरताना दिसले, याचा त्यांनी व्हिडिओ रेकॉर्ड करत तो अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना टॅगही केला. या संदर्भात सेठ यांनी नोंदविलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे, की आमच्या जेवणाच्या टेबलावर एक अनपेक्षित पाहुणा आला, एखाद्या रेस्टॉरंटमध्ये अशा प्रकारची घटना घडणे ही स्वच्छतेमधील मोठी चूक आहे. झुरळाला पाहून भूकच गेली. पिझ्झा किंवा पास्ता कितीही चांगला असला तरी निघून जाणेच योग्य होते. सेठ यांनी यानंतर "आपण मुंढे यांच्या भागामध्ये आहोत, त्याबद्दल आभार मानायला हवेत," अशी सूचक प्रतिक्रियाही व्यक्त केली.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणीबाबत महिलांना मार्गदर्शन

■ बारामती: (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' अन्वये महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी प्रक्रियेबाबत महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महिला शेतकऱ्यांनी अधिकाधिक संख्येने ऑनलाइन नोंदणी करून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक गणेश जाधव यांनी केले.

पुणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमांतर्गत भैरवनाथ मित्र मंडळ, रुई तसेच श्री सिद्धी गणेश मंडळ, बारामती येथे आयोजित संवाद कार्यक्रमात श्री. जाधव यांनी महिला शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आली. महिला शेतकऱ्यांचा फॉर्मर आयडी काढणे, त्याची नोंदणी करणे तसेच पोर्टलवर अर्ज सादर करण्याची प्रक्रिया याबाबत उपस्थित महिलांना सविस्तर माहिती देण्यात आली.

शेती आणि शेतीपूरक कामांमध्ये योगदान देणाऱ्या महिलांना अधिकृत ओळख मिळावी, यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' लागू करण्यात आला आहे. जमिनीची मालकी नसली तरी शेती व शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे. यामध्ये मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन आणि रेशीम उद्योग करणाऱ्या महिलांचाही समावेश करण्यात येणार असल्याचे श्री. जाधव यांनी सांगितले. पोर्टलवर अर्ज करताना आधार क्रमांक व ओटीपीद्वारे पडताळणी, वैयक्तिक माहिती भरणे, शेतीविषयक तपशील नोंदविणे तसेच फॉर्मर आयडी जोडण्याची प्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. अर्जातील माहिती अचूक भरूनच अर्ज सादर करावा.

## बेकायदेशीर शस्त्रसाठा जप्त

### बारवनगर येथे माळेगाव पोलिसांची धडक कारवाई

■ बारामती: (दै. संध्या)



माळेगाव - माळेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे बारवनगर, ता.बारामती,जि. पुणे येथे बेकायदेशीररीत्या घातक शस्त्रे बाळगणाऱ्या इसमाविरुद्ध माळेगाव पोलिसांनी कारवाई करून तलवारी,कोयता,सत्तुर,सुरा व कु-हाड अशी एकूण ७ घातक शस्त्रे जप्त केली आहेत.

दि. १८/०९/२०२६ रोजी सायंकाळी सुमारे ०६.०० वाजता मौजे बारवनगर गावच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी दादा नथुराम शिंदे, रा.बारवनगर,ता.बारामती,जि.पुणे याच्याविरुद्ध माळेगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २५४/२०२६, शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान आरोपीच्या राहत्या घरासमोरील परिसरातून खालील शस्त्रे जप्त करण्यात आली— 1. स्टीलची तलवार - अंदाजे किंमत ₹५००/- 2. लोखंडी तलवार - अंदाजे किंमत ₹४००/- 3. स्टीलची तलवार - अंदाजे किंमत ₹२००/- 4. लोखंडी कोयता - अंदाजे किंमत ₹१००/- 5. लोखंडी सत्तुर – अंदाजे किंमत ₹२००/- 6. लोखंडी सुरा – अंदाजे किंमत ₹१००/- 7. लोखंडी पाते असलेली कु-हाड – अंदाजे किंमत ₹१००/- एकूण किंमत ₹१,६००/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीकडे कोणताही वैध परवाना नसताना वरीलप्रमाणे घातक शस्त्रे बेकायदेशीररीत्या बाळगल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. माळेगाव पोलीस ठाणे हद्दीमध्ये जुन २०२६ पासून एकूण ४ अग्निशत्रे व १२ हत्यारे जप्त करून एकूण ८ गुन्हे दाखल करून १३ आरोपी विरुद्ध कारवाई करणेत आली आहे. सदरची कामगिरी मा.संदीपसिह गिल पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,मा.गणेश बिरादार अपर पोलीस अधीक्षक बारामती विभाग,मा.चैतन्य कदम उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ माळेगाव पोलीस स्टेशन,पोलीस उपनिरीक्षक देविदास साळवे, संजय मोहिते,पोलीस अंमलदार अजय अवघडे,वैभव मोहोळकर, विजय वाघमोडे,महेश पठारे, सागर पवार यांनी केली आहे.

## स्त्री ही कुटुंबाचा आधार; तिने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक : डॉ. शुभांगी वाघमोडे

■ बारामती: (दै. संध्या)




स्त्री ही कुटुंबाचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून, कुटुंबातील प्रत्येकाची काळजी घेताना तिने स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये, स्वतःच्या आरोग्याच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता आवश्यक वेळी वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्यविषयक मार्गदर्शनातून करण्यात आले.

माहिती व जनसंपर्क विभागांतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात अनंत युवा प्रतिष्ठान, सूर्यनगरी,विठ्ठल नगर गणेश मंडळ, रुईपाटी आणि अहिल्या गणेश मंडळ, हरी कृपा नगर, बारामती येथे वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्त्रीरोग तज्ञ डॉ. शुभांगी वाघमोडे यांनी

महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करताना नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले.

रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन तसेच आवश्यक जीवनसत्त्वे व खनिजांची तपासणी वेळोवेळी करणे गरजेचे आहे. महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाच्या कर्करोगाबाबत जागरूकता आणि तपासणी, तसेच गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी (Cervical Cancer) स्क्रीनिंग करण्याचे महत्त्वही स्पष्ट करण्यात आले.

गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती करण्यात आली. आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, चालणे, संतुलित आहार, पुरेसे पाणी पिणे आणि दैनंदिन जीवनात सक्रिय राहण्याचा सल्ला देण्यात आला.कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या स्त्रीचे आरोग्य उत्तम राहिल्यास संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य आणि जीवनमानही अधिक चांगले राहते. त्यामुळे "स्वतःची काळजी घेणे ही स्वार्थाची गोष्ट नसून कुटुंबासाठीची जबाबदारी आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला.

२४ सप्टेंबर पर्यंत राबविण्यात येणाऱ्या लोकसंवाद उपक्रमात विविध शासकीय विभागांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने केले आहे.

## मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांचे कायमस्वरूपी समायोजन करा

■ भिवंडी : (दै. संध्या)

मुंबईत कार्यरत असलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतच कायमस्वरूपी समायोजन करण्यात यावे, तसेच याबाबत तातडीने शासन निर्णय (GR) निर्गमित करावा, या प्रमुख मागणीसाठी मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद कार्याध्यक्ष प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी महाराष्ट्राचे शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. डॉ. पंकज भोयर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

मुंबईतील अनेक शिक्षक मुंबईतच कार्यरत असून त्यांच्या समायोजनाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकांच्या सेवासातत्याचा, स्थैर्याचा तसेच मुंबईतील शाळांमधील उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करून मुंबई महानगरपालिका क्षेत्रातच कायमस्वरूपी समायोजनाची स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करून शासन निर्णय काढावा, अशी मागणी डॉ. कडणे यांनी केली. यापूर्वीही या प्रश्नाच्या पाठपुराव्यासाठी मंत्रालयात शालेय शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्याकडे निवेदने, भेटी आणि पाठपुरावा करण्यात आला आहे. अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाला शासनाच्या धोरणात्मक चौकटीत महत्त्व दिले गेले असल्याचे उपलब्ध शासन निर्णयांमधूनही दिसून येते. विशेषतः मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न मुंबई महानगरपालिका स्तरावरच कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासनस्तरावर स्वतंत्र निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. कडणे यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. या प्रश्नावर यापूर्वी झालेल्या मंत्रालयीन पाठपुराव्याचा संदर्भ देत डॉ. कडणे यांनी सांगितले की, अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा विषय अंतिम निर्णयाच्या दिशेने नेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. यापूर्वीही शिक्षण विभागाशी संबंधित प्रश्नांवर मंत्रालयात भेटी घेऊन निवेदने साद करण्यात आली असून, मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे. शासनाच्या अधिकृत कागदपत्रांमध्येही अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन हा शालेय शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्रातील महत्त्वाचा विषय असल्याचे नमूद आहे.

## लोकसंवाद-२०२६' अंतर्गत सुरक्षित रस्ता वाहतूक यावर विशेष कार्यक्रम

■ बारामती(दै. संध्या)

वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून वाहतूक सुरक्षा हा सुरक्षित जीवनाचा मार्ग आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे प्रदीप काळे यांनी केले.

पुणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमांतर्गत भिगवण चौकातील श्री सिद्धी गणेश ट्रस्ट व मंडळ येथे रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांबाबत आयोजित संवाद कार्यक्रमात श्री. काळे नागरिकांशी संवाद साधत होते.

रस्ते वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्य महामार्ग वाहतूक पोलीस तसेच मोटार वाहन कायद्यानुसार निर्धारित नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. दुचाकी चालविताना तसेच मागे बसताना हेल्मेटचा वापर करावा. चारचाकी वाहनातून प्रवास करताना सीटबेल्टचा वापर करणे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. दारू अथवा अंमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालवू नये, वाहनाची वेगमर्यादा पाळावी आणि वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळावा, असे त्यांनी सांगितले.

वाहन चालविताना वैध वाहन चालविण्याचा परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, वाहन विमा आणि प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) यांसह आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. वाहतूक सिग्नलचे पालन करणे, रस्ता ओलांडताना आवश्यक खबरदारी घेणे, स्कूल बस व रिक्षातून प्रवास करताना दक्षता बाळगणे तसेच रस्त्यावरील सूचना फलकांवरील निर्देशांचे पालन करणे गरजेचे असल्याचेही श्री. काळे यांनी सांगितले. रस्ता सुरक्षा ही केवळ वाहतूक यंत्रणेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेशी संबंधित सामूहिक जबाबदारी आहे. वाहतूक नियमांचे पालन करून अपघात टाळण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

